| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५४ वा | मंगळवार, दिनांक १२ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ३ मे रोजी झालेली NEET २०२६ परीक्षा अखेर रद्द

***नवी दिल्ली/वृत्तसंस्था: देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लागलेल्या 'नीट' परीक्षेबाबत केंद्र सरकारने अखेर मोठा निर्णय घेतला आहे. पेपरफुटीच्या आरोपांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेली ३ मे २०२६ रोजी झालेली 'नीट' परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राष्ट्रीय चाचणी संस्थेने (National Testing Agency) घेतला असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला आहे.***




गेल्या काही दिवसांपासून परीक्षेतील गोंधळावरून देशभरातून संताप व्यक्त केला जात होता. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून यातील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी सीबीआयमार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. तपासादरम्यान 'एनटीए' सीबीआयला सर्व प्रकारचे सहकार्य, आवश्यक कागदपत्रे आणि रेकॉर्ड उपलब्ध करून देणार आहे. या चौकशीतून पेपरफुटीचे धागेदोरे कोठपर्यंत पोहोचले आहेत, हे स्पष्ट होणार आहे.

**विद्यार्थ्यांना पुन्हा शुल्क भरण्याची गरज नाही**

परीक्षा रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी लवकरच फेरपरीक्षा घेतली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आधी अर्ज केले होते, त्यांना नवीन नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेले परीक्षा शुल्क त्यांना परत केले जाईल. फेरपरीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. 'एनटीए' आपल्या अंतर्गत संसाधनांचा वापर करून ही परीक्षा पुन्हा आयोजित करणार आहे.

**लवकरच नवीन वेळापत्रक**

फेरपरीक्षा नेमकी कधी होणार, याबाबतची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, 'एनटीए' लवकरच अधिकृत संकेतस्थळावर नवीन वेळापत्रक प्रसिद्ध करणार आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी अधिकृत माहितीसाठी 'एनटीए'च्या संपर्कात राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यात पुन्हा राजकीय हालचालींना वेग

## विधान परिषदेच्या १७ रिक्त जागांसाठी निवडणुका

**मुंबई/वृत्तसेवा–** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आता विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येणाऱ्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या जागा रिक्त असल्याने विधान परिषदेतील सदस्यसंख्येवर त्याचा परिणाम झाला होता. मात्र आता आवश्यक अटी पूर्ण झाल्यामुळे निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत न झाल्यामुळे अनेक मतदारसंघांतील विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही निवडणुका घेता आल्या नव्हत्या. नियमानुसार, संबंधित मतदारसंघात किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणे आवश्यक असते. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्याने ही अट पूर्ण झाली असून आता निवडणूक आयोगाकडून पुढील प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक पक्षांनी आतापासूनच रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ आहे. त्यापैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येतात. सध्या त्यातील १७ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर निवडणुका झाल्यानंतर विधान परिषदेतील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. विशेषतः पावसाळी अधिवेशनापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण झाल्यास सत्ताधारी आणि विरोधक



या दोन्ही बाजूंना आपली ताकद वाढवण्याची संधी मिळणार आहे.

ज्या मतदारसंघांमध्ये निवडणूक होण्याची शक्यता आहे, त्यामध्ये अहिल्यानगर, सोलापूर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, परभणी-हिंगोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर या मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांतील सत्तासंतुलन लक्षात घेता प्रत्येक पक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे.

राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ज्या पक्षांचे वर्चस्व आहे, त्यांना या निवडणुकांमध्ये मोठा फायदा होण्याची शक्यता मानली जात आहे. त्यामुळे उमेदवारीपासून ते मतदार व्यवस्थापनापर्यंत सर्व स्तरांवर हालचालींना वेग आला आहे. अनेक इच्छुक नेत्यांनी पक्षश्रेष्ठींकडे संपर्क साधण्यास सुरुवात केली असून, काही ठिकाणी उमेदवारीवरून अंतर्गत स्पर्धाही वाढताना दिसत आहे.

# टि. डि. आर. बाबत महानगरपालिकेचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना सुचित करण्यात येते की, लातूर शहर विकास योजनेअंतर्गत (DP) आरक्षणाखालील जमिनींबाबत ही सूचना देण्यात येत आहे.

ज्या भूधारकांची जमीन विकास योजनेत सार्वजनिक उद्देशांसाठी आरक्षित आहे किंवा विशेषतः विकास योजना रस्त्याने बाधित होत आहे, त्यांनी स्वेच्छेने ती जमीन लातूर महापालिकेकडे हस्तांतरित केल्यास. जागेची भरपाई म्हणून हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) दिले जातील, सदर TDR हा FSI स्वरूपामध्ये वापरता येईल किंवा तो विक्री करता येईल. तसेच जर भूधारकाची जमीन इतर सार्वजनिक उद्देशासाठी आरक्षित असेल तर त्या भूधारकांना सुद्धा accomdation reservation, Amenity ढवी व इतर अनुषंगिक लाभ देण्याची तरतूद आहे. संबंधित प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी टीडीआर मंजुरीची प्रक्रिया दोन टप्प्यांत ऑनलाईन राबविण्यात येत आहे.

प्रथम टप्प्यात, भूधारकाने आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर प्राथमिक मंजुरी (Preliminary -pproval) दिली जाईल. या मंजुरीनंतरच दुसऱ्या टप्प्यात जमीन प्रत्यक्ष प्राधिकरणाकडे हस्तांतरित होईल आणि त्यानंतर मोजणी झाल्यानंतर अंतिम टीडीआर मंजुरी (Final Approval) दिले जाईल.या द्विस्तरीय प्रक्रियेमुळे भूधारकांना त्यांच्या हक्कांचा योग्य आणि वेळेत लाभ मिळेल.

लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

# भारताची जनगणना २०२७ अंतर्गत 'स्वगणना' करण्यासाठी १५ मे पर्यंत मुदत !

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून, यावेळी केंद्र सरकारने नागरिकांसाठी प्रथमच 'स्वगणना' हा अत्यंत सोयीचा आणि डिजिटल पर्याय उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्र राज्यासाठी ही सुविधा १ मे पासून सुरू झाली असून, ती १५ मे २०२६ पर्यंत उपलब्ध राहणार आहे. आता या सुविधेसाठी शेवटचे काही दिवस शिल्लक असल्याने, लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

भारताची आगामी जनगणना ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'डिजिटल' स्वरूपात पार पडणार आहे. यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'स्वगणना' (डशश्रष-एपीीशीरींळेप). गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जनगणना संचालनालयाने नागरिकांना स्वतःची माहिती स्वतःच ऑनलाइन भरण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. राज्यात स्वगणनेचा कालावधी १ मे ते १५ मे पर्यंत असून, त्यानंतरची घर गणना प्रक्रिया १६ मे ते १४ जून या कालावधीत पार पडेल.

**स्वगणना म्हणजे काय?**

स्वगणना म्हणजे नागरिकांनी कोणत्याही प्रगणकाची (एपींशीरीीं) वाट न पाहता, स्वतःच्या कुटुंबाची माहिती सरकारी पोर्टलवर जाऊन स्वतःच नोंदवणे. ही सुविधा सुरक्षित, सोपी आणि वेळेची बचत करणारी आहे.

स्वगणनेसाठी आवश्यक अटी

कुटुंबातील व्यक्तीकडे मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

कुटुंबातील मुख्य व्यक्तीद्वारे किंवा त्याच्या वतीने नोंदणी केली जाईल.

एकदा नोंदणी पूर्ण झाल्यावर कुटुंबप्रमुखाचे नाव बदलता येणार नाही.

**स्वगणनेचे फायदे**

ही सुविधा प्रत्यक्ष जनगणना सुरू होण्याच्या १५ दिवस आधी उपलब्ध करून दिली जाते. लोकांना प्रगणकाची घरी येण्याची वाट पाहावी लागत नाही. इच्छुक व्यक्ती आपल्या सवडीनुसार अचूक माहिती सादर करू शकतात.

**स्वगणना करण्याची टप्प्याटप्प्याने प्रक्रिया**

स्वगणनेसाठी नागरिकांनी https://se.census.gov.in/ या अधिकृत पोर्टलला भेट देणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया खालील ६ टप्प्यांत विभागलेली आहे:

**टप्पा १: लॉगिन आणि पडताळणी**

- पोर्टलवर गेल्यावर तुमचा राज्य/केंद्रशासित प्रदेश निवडा.

- कुटुंबप्रमुखाचे नाव आणि मोबाईल क्रमांक नोंदवा.

- मोबाईलवर प्राप्त झालेला जढझ (One Time Password) टाकून पडताळणी पूर्ण करा.

- आपल्याला सोयीची भाषा (उदा. मराठी) निवडा.

भारत की जनगणना 2027 CENSUS OF INDIA

जनगणना से जन कल्याण

**टप्पा २: स्थान आणि घराची माहिती**

- नकाशावर आपल्या घराचे अचूक स्थान (Location) चिन्हांकित करा.

- घराच्या बांधकामाचे स्वरूप (भिंती, छप्पर, मजल्यांचे साहित्य) निवडा.

**टप्पा ३: कुटुंबातील सदस्यांची माहिती**

- कुटुंबात एकूण किती सदस्य राहतात त्यांची संख्या नोंदवा.

- कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग, जात (SC/ST असल्यास) आणि इतर वैयक्तिक तपशील भरा.

**टप्पा ४: उपलब्ध सोयीसुविधा**

- घरात पिण्याच्या पाण्याचा स्रोत, वीज कनेक्शन, शौचालय आणि स्वयंपाकासाठी वापरले जाणारे इंधन (उदा. LPG) याची माहिती द्या.

**टप्पा ५: कुटुंबाची मालमत्ता आणि साधने**

- तुमच्याकडे रेडिओ, टेलिव्हिजन, लॅपटॉप/कॉम्प्युटर, इंटरनेट सुविधा, सायकल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन आहे का, याची माहिती नोंदवा.

**टप्पा ६: पूर्वावलोकन (Preview) आणि सबमिशन**

- भरलेली सर्व माहिती एकदा तपासून पहा.

- माहिती योग्य असल्यास 'सबमिट' बटणावर क्लिक करा.

**५. स्व-ओळख क्रमांक (SE-ID) चे महत्त्व**

नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर स्क्रीनवर एक 'स्व-ओळख क्रमांक' (Self-Enumeration ID - SE ID) दिसेल. हा क्रमांक जपून ठेवावा. जेव्हा प्रगणक (Enumerator) तुमच्या घरी प्रत्यक्ष भेटीसाठी येतील, तेव्हा त्यांना फक्त हा क्रमांक दाखवावा लागेल.

लातूर जिल्ह्याने नेहमीच डिजिटल उपक्रमात आघाडी घेतली आहे. जनगणनेच्या या राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवण्यासाठी १५ मे पर्यंतचा वेळ आहे. लातूर शहर आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सुशिक्षित नागरिकांनी स्वतःची माहिती स्वतः भरून या आधुनिक उपक्रमाला सहकार्य करावे. स्वगणनेची सुविधा केवळ १५ मे २०२६ पर्यंतच उपलब्ध आहे. त्यानंतर १६ मे पासून प्रगणकांद्वारे प्रत्यक्ष गृहभेटीची मोहीम राबवली जाणार आहे, असे लातूर जिल्हा प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

## प्रभात किरणे

साहित्यिक जातीचा असतो
पण साहित्याला जात नसते
साहित्यातून धर्म जात मांडतो
तो कधीच साहित्यिक नसतो

इंजि. नागनाथ कलवले, लातूर
मो. ९७६४७ ८८२८८

## धक्का लागल्याच्या कारणावरुन एकाला लुटले

**लातूर/प्रतिनिधी:** ' तू आम्हाला धक्कादिला, असे म्हणत शिवीगाळ करून धक्काबुक्की करीत एका २४ वर्षीय तरुणाला दोघा अज्ञातांनी लुटल्याची घटना शनिवारी रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास बस स्थानकाच्या मागील अंबिका मंदिराच्या परिसरात घडली.फिर्यादी सूरज अनिल वडे (वय २४, रा. औसा) हा तरुण शनिवारी बाजारातून खरेदी करून चालत जात होता. तो बसस्थानकाच्या मागील अंबिका मंदिराजवळआला असता अज्ञात अंदाजे २० वर्षे वयाचे दोन तरुण त्याच्या जवळ आले. 'तू आम्हाला धक्का का दिलास', असे म्हणत सूरज वडे याच्यासोबत वाद घालू लागले. वडे याच्या खिशातील दोन मोबाईल व रोख चार हजार रुपये काढून घेतले. घटनेनंतर हाकेच्या अंतरावर असलेल्या गांधी चौक पोलीस ठाण्यात वडे याने येऊन फिर्याद दिली. अज्ञात दोघांविरोधात गुन्हा दाखल आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मोदीच्या आवाहनानंतर ज्वेलरी शेअर १०% घसरले.....

## चिमटा



दयाचा

श्वानाचा उपद्रव हा,
लातूरकरांची नवीन
समस्या नाही!
लातूर महानगरपालिकेचे
याकडे लक्ष नाही!!
या त्रासातून लातूरकरांची
सुटका नाही...!!!


# भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा सत्कार



**अहमदपुर/प्रतिनिधी:** प्रदेश भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते तथा मुंबई महानगर पालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक नवनाथजी बन यांचा यथोचित सत्कार भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी नुकताच सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. संघर्ष मय जिवण जगत असताना परीस्थितीवर मात करून मुंबई मध्ये अल्प अवधीत राजकीय प्रस्त निर्माण करुन मुंबई महानगर पालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाकडून मोठ्या मताधिक्याने नगरसेवक म्हणून म्हणून विजयी झालेले कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विश्वासू म्हणून महाराष्ट्रात सर्वदुर परिचित असलेले भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते नवनाथजी बन यांचा गोविंद गिरी यांनी सत्कार केला. गॅलक्सी हॉस्पीलचे सुप्रसिध्य डॉक्टर विश्रांतजी भारती यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सचिव पदी निवड झाल्यामुळेही सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

# देशातील कत्तलखाण्यातून आतंकवाद्याना पैसा पुरवला जातो,गोहत्या बंद करणे आवश्यक : मिलिंद एकबोटे

**लातूर/प्रतिनिधी :** बकरी ईद हा मुस्लिमांचा सण जवळ येत असून या दिवशी एकही गाय कापली जाऊ नये म्हणून लातूर जिल्ह्यातील गोरक्षकांनी कायदेशीर दक्ष राहावे, असे आवाहन अखिल भारतीय कृषी गोसेवा संघांचे महाराष्ट्र अध्यक्ष आणि कट्टर हिंदुत्ववादी नेते मिलिंद एकबोटे यांनी लातूर येथे केले. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. गोरक्ष कायद्यासंदर्भात गोरक्षकांचे मार्गदर्शन व्हावे, यासाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने मिलिंद एकबोटे लातुरात आले होते. पत्रकार परिषदेला अ. भा. कृषी गोसेवा संघांचे लातूर जिल्हाध्यक्ष आदर्श अजित जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.मिलिंद एकबोटे पुढे म्हणाले, देशातील कत्तलखाण्यातून आतंकवाद्याना पैसा पुरवला जातो. असा केंद्रीय तपास यंत्रनेचा अहवाल आहे. त्यामुळे



गोहत्या बंद करणे आवश्यक आहे. लातूर जिल्ह्यातही गोहत्येचे प्रमाण वाढले आहे. गोरक्षकावरच गुन्हे दाखल केले जात आहेत. गोहत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी होत नाही. उलट पोलीस आणि लोकप्रतिनिधी एकमेकांच्या हातात बांगड्या घालून बसले आहेत. संविधानाच्या मार्गदर्शक तत्वात गोरक्षणासाठी प्रत्येक राज्य सरकारने केला पाहिजे, गोरक्षण शासनाचे कर्तव्य मानले आहे. गाय आमची माता आहे. तीची हत्या होऊ देणार नाही. गोरक्षणासाठी गोरक्षकांना रस्त्यावर उतरावे लागते. हे सरकारचे कुचकामी धोरण आहे. असेही मिलिंद एकबोटे यावेळी म्हणाले. भाजप आमचा सख्खा भाऊ आहे. पण त्यांचा प्रतिस्पर्धी काँग्रेस पक्ष हा कशायांची पार्टी आहे. काँग्रेसमुळेच गोहत्या वाढली. ही गोहत्या थांबली पाहिजे. पोलीस गोहत्या थांबवत नसतील तर गोरक्षकांना पोलिसांत भरती करावे, मग आपोआप गोहत्या थांबेल. औसा तालुक्यातील गोहत्येबाबतच्या प्रश्नावर ते म्हणाले, आमदार अभिमन्यू पवार हे आरएसएसची शिकवणूक विसरले आहेत. या पत्रकार परिषदेला अ. भा. कृषी गोसेवा संघांचे लातूर जिल्हाध्यक्ष आदर्श जैन,ॲड. राजूभाऊ गुप्ता, विठ्ठल आगराळे, आशिष बारीक, नरेंद्र बोरा, निलकंठेश्वर महाराज डावखरे आदींची उपस्थिती होती.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पंतप्रधानांचा आवाहनास साथ द्या

ज्या-ज्या वेळी युद्धाची स्थिती निर्माण होते त्या-त्या वेळी नागरिकांनी विचारपुर्वक वागले पाहिजे. त्याच प्रमाणे सर्व परिस्थितीचा अंदाज घेवून चालले पाहिजे. आता तर पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा, असे आवाहन त्यांनी रविवारी केले. हैदराबाद येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या 'होर्मुझची सामुद्रधुनी' बंद झाल्याने भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पंतप्रधान म्हणाले की, आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. यामुळे केवळ परकीय चलन वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार हे विचार करायाला लावणारे आहे. सध्याच्या स्थितीत कोणाचेही केंद्रस्थानी सरकार असले तरी हाच विचार सुचविला असता. देशात अजून मोठे संकट आले नसले तरी पुर्व काळजी म्हणून विचार केला पाहिजे. भारतात इंधन तयार होत नाही किंवा तेलाच्या खाणी नाहीत. भारताची जगाला अन्न पुरविण्याची, फळे आदि पुरविण्याची क्षमता आहे. भारतीय इतर सर्व बाबतीत सक्षम आहेत. ते कोणालाही घाबरत नाहीत. असे जरी असले तरी अमेरिकेचा धुर्त कावा हा जगाला नडत आहे. एकट्या अमेरिकेने जगाला नाकेनवु आणले आहे. जगाला वेठीस धरले आहे. इराण हा जगाला इंधन पुरविणारा देश आहे. जगाला 'होर्मुझची सामुद्रधुनी' मार्गेच इंधन पुरवू शकतो. एक तर अमेरिका इराणवर इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून लढत आहे. ईराण शरण येईल. घुडगे टेकेल असे वाटत असताना तो शह देत आहे. अमेरिकेच्या मागण्या धुडकावत आहे. अमेरिकेला विचार करायाला भाग पाडत आहे. भारत सुद्धा आपली दमदार वाटचालद्वारे समोरच्यांना विचार करायाला लावत आहे. मुळात जागतिक संकट केवळ भारतावर नाही तर जगावर आहे म्हणून याला जागतिक संकट म्हटले आहे. इंधन महत्त्वाचे आहे. त्यामुळे याचा वापर जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. त्याच प्रमाणे गॅसची तीच परिस्थिती आहे. मुळात भारताने काही वर्षापुर्वी इंधनावर मात करण्याची सुरवात केली आहे. इलेक्ट्रिक गाड्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे. आता सर्वाधिक ईव्ही वापरली जात आहे. दोनचाकीचा वापर वाढला आहे, त्याच प्रमाणे यात चारचाकी गाड्याची ओढ निर्माण झाली आहे. ईलेक्ट्रिक चार्जिंग हे सुर्यप्रकाशावर होणार आहे. अधिकाधिक सौरऊर्जेचा वापर वाढला आहे. नागरिकांना सुद्धा कळले आहे की, खनीज संपत्ती एक ना एक दिवस संपणार आहे. जग असे पर्यंत सुर्य-चंद्र असणार आहे.त्यामुळे जगच भारत सोडला तर इतर काही देश मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जेचा वापर करीत आहे. काही झाले तरी देशात आता सौरऊर्जेवर चालणाऱ्या बाबीची उभारणी मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. पेट्रोल-डिझेल याला पर्याय केवळ सौरऊर्जाचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पेट्रोल-डिझेलचा वापर आवश्यक तेवढाच करावा. एक दिवस, एक शहर/गावात कोणीही गाडी वापरू नये.दोन असो किंवा चार चाकी असो एक दिवस वापरली जावू नये. आवश्यकता वाटली तर सायकल वापरावी. काही फरक पडत नाही. मुळात आपल्या देशातील नागरिकांना चांगले माहिती आहे की, अमेरिका इन-डायरेक्ट दबाव निर्माण करीत आहे. मोठ्या टेरिफ चार्ज लावला जात आहे. रशियाकडून इंधन खरेदी न करता अमेरिकेकडूनच खरेदी करावे अशी सक्ती करीत आहे. त्यामुळें भारतीयांनी जागृत राहून पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केलेले कळकळीच्या आवाहनास साथ दिली पाहिजे. मुळात इंधन, पेट्रोल-डिझेल व गॅस टंचाई ही जागतिक संकट आहे. जागतिक गुलामगिरी न पत्कारणे हीच मोठी परिक्षा आहे. काही झाले तरी जागतिक संकटावर मात करण्यासाठी काही कटू निर्णय घ्यावे लागणार! इंधनावर मात करण्यासाठी पर्याय भारताकडे आहेत. अनेक घरावर सौरऊर्जाचे प्लंटची उभारणी केली आहे. याला अधिक गती देण्याची गरज आहे. अतिषय अल्प दरात सौरऊर्जा निर्मितीचा प्लंट सक्तीने लावला पाहिजे. आगामी काळात कोळशासवर किंवा पाण्यावर वीज निर्मिती अशक्य होणार आहे. पावसाळा कमी होत आहे. निसर्गाचा वाढता ऱ्हास होत असल्याने पावुस कमी पडतो तर एक ना एक दिवस कोळशाच्या खाणीतून कोळसा संपणार आहे. ईश्वराने हे ओळखुन मोफत सुर्यप्रकाशावर वीज घरच्याघरी निर्मितीची सुविधा दिली आहे. आज महावितरणला वीज विकून अनेक कुटुंबिय मोफत वीज वापरत आहे. शुन्य वीज वापराचे बील येत आहे. सौरऊर्जावर टूव्हिलर चार्जिंग केली जात आहे. दररोज शंभर रूपयाचे पेट्रोल लागत असेल तर दहा रुपये चार्जिंग खर्च येत आहे. त्यामुळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी जागतिक संकटाची चाहूल लागताच सावध केले आहे. याला देशातील तमाम नागरिकांनी साथ दिली पाहिजे. काही झाले तरी गरज असेल तरच इंधनाचा वापर करण्याची सवय लागली पाहिजे. जो पर्यंत अमेरिकेचे सुत्र ट्रम्प यांच्याकडे आहेत तो पर्यंत जागतिक शांतता नांदेल असे वाटत नाही. काही ही निर्णय घेतले जात आहेत. गरज नसताना युद्ध इंधनाच्या विहीरीवर ताबा मिळविण्यासाठी युद्ध छेडले आहे. हे सर्वांना कळाले आहे. पेट्रोल-डिझेल व गॅसची कमतरता भासण्याची शक्यता आहे त्यामुळे सावध राहूल वापर करणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तमाम जनतेला केलेल आवाहास साथ दिली पाहिजे. आज पासुन काटकसरीने वापर करण्यात सुरवात करावी. गॅसचा वापर आवश्यतेनुसार करावा. आवाहनास साथ देवून इतरांनाही साथ देण्यासाठी तयार राहावे.

# निःस्पृह कर्मयगी डॉ. गोपाळराव पाटील



**मागील काही काही महिन्यात लातूर च्या क्षितिजावर अलौकिक कार्य करून लातूर चे नाव राजकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावरती ठसा उमटविनारे शिवराज पाटील चाकूरकर, शैक्षणिक दीपस्तंभस्तव कार्य करणारे जनार्धन वाघमारे व सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय विश्वात दिशादर्शक कार्य करणारे डॉ. गोपाळराव पाटील ह्या त्रिमूर्ती ला नियतीने आपल्यातून हिरावून घेतले, ज्यामुळे समस्त महाराष्ट्राची अपरिमित हानी झाली आहे .**

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले. या उक्तीला खऱ्या अर्थाने सार्थ ठरवणारे,मागच्या पाच दशकाहूनही अधिक काळ शिक्षणाचा ज्ञानदीप अखंडपणे चालवणारे, उभ्या महाराष्ट्रात ज्ञानाची पंढरी म्हणून शिवछत्रपती शिक्षण संस्था अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालयाचीा शान एका वेगळ्या उंचावर नेऊन ठेवण्यासाठी तहहयात निस्वार्थ आणि निस्पृह भावनेनेच कार्य करणारे, शाहू शिक्षण पॅटर्नचे जनक, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, संस्थापक, बालरोगतज्ज्ञ, माजी खासदार आदरणीय डॉ. डॉ . गोपाळराव पाटील यांचे नुकतेच निधन झाले आणि लातूरच्या शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात न भरून निघणारी हानी झाली. डॉ. गोपाळरावजी पाटील यांनी केवळ वैद्यकीय क्षेत्रातच सेवा दिली असं नाही, तर शिक्षण क्षेत्रात त्यांनी शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या' माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले.आजच्या दिखाऊ,वरवरचा डामडौल,प्रसिद्धीचा हव्यास या पासून दूर राहून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्याकरीता केवळ गुणवत्तापूर्ण प्राध्यापकांची नेमणूक केली. राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात लातूर पॅटर्न चांगलाच गाजतो आहे, त्यास यश मिळाले या पॅटर्नमागे अनेकांचं मेहनत आणि कार्य राहिलेलं आहे. याच लातूर पॅटर्नला जगभरात ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील हे होत.

शिक्षण, आरोग्य, समाजकारण या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे दूरदर्शी शिक्षणमहर्षी, असंख्य बालकांना नवजीवन देणारे संवेदनशील वैद्यकीय तज्ञ आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध लोकप्रतिनिधी, एक संयमी, सुसंस्कृत आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्व अशी त्यांची छबी कायम स्मरणात राहणारी आहे.

चिंतनशील अभ्यासू व्यक्तिमत्व, प्रचंड वाचन, विविध विषयांचा अभ्यास, तीव्र समरणशक्ती असलेले डॉ गोपाळराव हे प्रामाणिक, सोज्वळ, कठोर, निगर्वी, निःस्वार्थी, प्रामाणिक, तत्वनिष्ठ होते. माणुसकी जपणारे एक निष्णात डॉक्टर व सामाजिक भान असणारे एक कर्तव्यतत्पर संस्थाध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य सर्वासाठी दिशादर्शक असेल .

डॉ. गोपाळराव विठ्ठलराव पाटील (३ ऑक्टोबर १९३१ – २१ एप्रिल २०२६) हे लातूर, महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राज्यसभा खासदार होते. लातूर पॅटर्नचे शिल्पकार म्हणून ते विशेष ओळखले जात होते.

जन्म आणि शिक्षण: ३ ऑक्टोबर १९३१ रोजी धाराशिव जिल्ह्यातील कवठा येथे जन्म. त्यांनी उस्मानिया विद्यापीठातून एम.बी.बी.एस. , डी.सी.एच. ही वैद्यकीय पदवी घेतली.

**वैद्यकीय कारकीर्द – समाजसेवक डॉक्टर नव्हे तर देवमाणूस**

बालरोगतज्ज्ञ म्हणून डॉ. पाटील यांनी लातूरमध्ये आपली सेवा सुरू केली. ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांची आयुष्यभर मोफत सेवा केल्यामुळे त्यांना 'देवमाणूस' म्हणून ओळखले जात असे. त्यांनी इंडियन पेडियाट्रिक असोसिएशनची शाखा स्थापन केली आणि त्याचे पहिले अध्यक्ष म्हणून काम केले. बालरोगतज्ज्ञ म्हणून त्यांनी लातूरमध्ये दीर्घकाळ सेवा दिली

१९६५ साली त्यांनी लातूरमध्ये खाजगी प्रॅक्टिस सुरू केली. त्याचबरोबर मुरुड परिसरात १२ वर्षे विनामूल्य वैद्यकीय सेवा देऊन त्यांनी समाजात विशेष स्थान मिळवलं. त्यांच्या या कार्यामुळे लोक त्यांना देवमाणूस म्हणून संबोधत.

**शिक्षण क्षेत्रातील योगदान –लातूर पॅटर्न –:** शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाने 'लातूर पॅटर्न' विकसित करून ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली, हजारो विदयार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देण्यासोबत अनेक होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी डॉक्टर, अभियंते म्हणून घडवले.

राजकीय कारकीर्द: भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते म्हणून त्यांनी काम केले. १९९४ ते २००० या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. त्यांनी लोकसभेची निवडणूकही लढवली होती. उत्तम अभ्यासक,लेखक, अभ्यासू व तर्कशुद्ध मांडणी करण्यासाठी सुप्रसिद्ध होते. जगभरात घडणारे बदल,आंतरराष्ट्रीय हितसंबंध, विज्ञान,तंत्रज्ञान, पर्यावरण, अर्थकारण, शिक्षण अश्या विविध विषयावर ते सतत चिंतनशील असत. देशातील सर्वोच्च सभागृह राज्यसभा येथे त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्या सभागृहाला साजेल असे कार्य त्यांच्या माध्यमातून घडलेआहे. अत्यंत अभ्यासू खासदार म्हणून तेथेही त्यांनी लौकिक मिळवला होता.

**पुरस्कार आणि मान्यता:** १९९८ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या अखिल भारतीय वैद्यकीय संघटनेच्या वार्षिक परिषदेत 'सर्वो त्कृष्ट डॉक्टर संसदीय पुरस्कार' प्रदान,लायन्स क्लब्स इंटरनॅशनलचे माजी जिल्हा गव्हर्नर. १९९८ साली त्यांना 'सर्वोत्कृष्ट डॉक्टर संसदपटू' हा सन्मान मिळाला होता.

**शिक्षण आणि संघटनात्मक कार्य :**

डॉ. पाटील हे शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांनी इंडियन पेडियाट्रिक असोसिएशनची शाखा स्थापन करून तिचे पहिले अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. तसेच अनेक राष्ट्रीय वैद्यकीय परिषदांमध्ये त्यांनी सहभाग नोंदवला.

**राजकारणातील योगदान :**

डॉ. गोपाळराव पाटील यांनी १९९४ ते २००० या कालावधीत राज्यसभेचे सदस्य म्हणून काम पाहिलं. त्यांनी वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार , रेल्वे आदी महत्त्वाच्या संसदीय समित्यांवर काम केलं.

शिक्षण, आरोग्य, समाजकारण या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे दूरदर्शी शिक्षणमहर्षी, असंख्य बालकांना नवजीवन देणारे संवेदनशील वैद्यकीय तज्ञ आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध लोकप्रतिनिधी अशी त्यांची ओळख प्रेरणादायी आहे . त्यांचे व्यक्तिमत्व हे साधेपणा, सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी यांचा सुंदर संगम होते. त्यांनी उभारलेल्या संस्था, जपलेली मूल्ये आणि समाजासाठी दिलेले योगदान हीच त्यांच्या कार्याची खरी अमर स्मृती ठरेल. शिक्षणमहर्षी उपाधीसाठी समर्पक ठरावे असे हिमालयाच्या उंचीचे त्यांचे कार्य भावी पिढीतील विद्यार्थ्यां च्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रकाश देईल .

आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील, जुने जाणते, समाजाभिमुख व्यक्तिमत्व होते. लातूर शहरात जुन्या पिढीतील बालरोग तज्ञ म्हणून ते सुपरचित राहिले. लातूर-धाराशिव जिल्ह्यातील जनतेची त्या काळातील आर्थिक स्थिती लक्षात घेऊन त्यांनी निस्वार्थपणे वैद्यकीय सेवा केली. पुढे शिवछत्रपती शिक्षण संस्थेची जबाबदारी त्यांच्याकडे आल्यानंतर, अत्यंत प्रमाणिकपणे आणि निष्ठेने त्यानी शिक्षण क्षेत्रात कार्य केले.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेमार्फत चालणारे राजर्षी शाहू महाविद्यालय, जिजामाता विद्यालय, यशवंत विद्यालय, संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल या व इतर शाळा महाविद्यालयातून त्या नावांना शोभेल अशा पद्धतीने त्या महान व्यक्तींच्या विचारांची शतप्रतिशत अंमलबजावणी त्यांनी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सहजगत्या उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाची कीर्ती महाराष्ट्र, देश आणि जागतिक पातळीवर पोहोचवली. या महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी दरवर्षी वैद्यकीय महाविद्यालये, आणि नामवंत अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवत आहेत, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन विविध प्रशासकीय पदांचे मानकरी ठरत आहेत. शिक्षण संस्थेतील सर्वच शाळा महाविद्यालयाच्या यशाचा हा आलेख मागच्या अनेक वर्षापासून वाढतोच आहे. या शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले हजारो उच्चशिक्षित तरुण आज जगभरात उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे जगभरात लौकिक असलेल्या लातूर शैक्षणिक पॅटर्नचे खरे शिल्पकार हे आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील ठरतात. ज्यांना महाराष्ट्रातील तमाम सर्वसामान्य व्यक्ती , विध्यार्थी , कर्मचारी आप्पा या नावाने आदराने संबोधत .

डॉ. गोपाळराव पाटील... एक प्रसन्न आणि आश्वासक असं व्यक्तिमत्त्व. व्यवसायाने डॉक्टर, पण त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात परिश्रम करून राजर्षी शाहू स्वायत्त महाविद्यालय यासारखी राज्यातील नामवंत संस्था अक्षरशः शून्यातून उभी केली. आज ९५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसही तेथे प्रवेश मिळणे दुरापास्त आहे; पण सुरुवातीला घरोघर फिरून मुले गोळा करून ह्या संस्थेचे काम सुरू झाले. मेरिटच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा म्हणून शिष्यवृत्ती देणारे हे महाविद्यालय सुरुवातीपासूनच आपला वेगळेपणा राखून आहे. याशिवाय अनेक उत्कृष्ट शाळा संस्थेने उभ्या केल्या. स्वतःच्या क्षेत्रात तर ते तज्ज्ञ आहेतच. लहान मुलांचा डॉक्टर असण्यासाठी जी संवेदनशीलता किंवा सहृदयता पाहिजे, ती डॉक्टरांकडे पुरेपूर असल्यामुळे 'लहान मुलांचे डॉक्टर' अशी त्यांची लोकप्रिय ओळख निर्माण झाली. अनेक कुटुंबातील लहान मुलांवर वेळेवर, आस्थेने उपचार केल्यामुळे गंभीर आजारातून बरे झालेल्या मुलांच्या कुटुंबीयांच्या मनात डॉक्टरांबद्दल आदराचे वेगळे स्थान आहे.

हाती घेईल त्या कामात उत्कृष्टतेचा ध्यास हा डॉ. पाटील यांचा एक साधारण गुण म्हणावा लागेल. काही वर्षांपूर्वी त्यांच्या संस्थेस भेट देण्याचा योग आला, त्यावेळी इलेक्ट्रॉनिक्स व जैवतंत्रज्ञाना सारख्या प्रगत तंत्रज्ञानाबद्दल त्यांना असणारी सखोल माहिती पाहून आश्चर्य वाटले. त्यांना याबद्दल विचारले असता, शिक्षकांच्या मुलाखती घेण्यापूर्वी डॉक्टरसाहेब त्या विषयाचे सखोल अध्ययन करत असत, असे कळले. त्यांच्यामधील ज्ञानार्जनाची इच्छा असणारा विद्यार्थी अजून ह्या वयातसुद्धा जागरूक आहे, पाहून त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला.

संस्कारशील कुटुंबातून आलेल्या डॉक्टर गोपाळरावांनी परिश्रमपूर्वक आपले शिक्षण पूर्ण केले. त्या काळात इंग्लंडला पुढील शिक्षणासाठीजाण्याचे स्वप्न सोडावे लागले; परंतू इथे राहून त्यांनी समाजासाठी एवढे मोठे कार्य करावे, हे विधिलिखीत कित्येक

**आयुष्याची प्रेरणा ठरले.**

मेडिकल कॉलेजला असताना माणसाने ओढलेल्या रिक्षातून कसे जावे म्हणून पायी चालत जाण्याचा कनवाळूपणा त्यांच्यात होता. बऱ्याच विद्यार्थ्यांना पुस्तके घेणे परवडत नव्हते, म्हणून स्वतःची पुस्तके वर्षभर नीट वापरून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचविण्याचा उपक्रम त्यांनी स्वतः तर सुरू केलाच पण आपल्या इतर मित्रांनाही हेच करण्यासाठी उद्युक्त केले. त्यांच्यातला सामाजिक जाणिवांचा उगम विद्यार्थिदशेपासूनच आहे हे यावरून दिसते.

हैदराबाद येथील मेडिकल कॉलेजमधील प्रोफेसर चलपती नायडू हे विद्यार्थ्यांना समजेल असे तर शिकवतच; पण वेळोवेळी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची चांगली उत्तरे वर्गात वाचून दाखवत आणि विद्यार्थ्यांसाठी एक स्पर्धात्मक तसेच प्रोत्साहनपर वातावरण तयार करत. त्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी अशा तत्काळ मूल्यांकनाच्या लातूर पॅटर्नची संकल्पना राजर्षि शाहू महाविद्यालयात रुजवली. नंतर तेथील समविचारी समर्पित प्राचार्य, प्राध्यापकवर्गाच्या योगदानातून 'राज्यातील एक अग्रगण्य संस्था' म्हणून नावारूपास आली आणि प्रख्यात 'लातूर पॅटर्न'ची निर्मिती झाली.

'केवळ गुणवत्ता' हाच निकष ठेवून सर्व स्तरांवर पारदर्शी प्रशासन असणारे हे महाविद्यालय मराठवाड्याच्या अभिमानाचा विषय आहे. शैक्षणिक मुल्यांची जपणूक, सामाजिक समता व लोकशाही, ग्रामीण-शहरी, हशार-सर्वसाधारण असा भेदभाव न करता. सर्व अभ्यासू व मेहनती शिक्षक प्राध्यापकांचा संच उभा करणे. गरीब-विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक सुविधा पुरविणे, कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली न येता, व्यक्तीस्तोम वाढीस न लागू देता, उद्दिष्टपूर्तीसाठी सतत कार्यरत राहणे, पुरोगामी, तसेच समाजास पूरक असणाऱ्या तत्त्वांचा अंगीकार करणे. ही आप्पांच्या उत्कृष्टतेच्या ध्यासपथाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांच्या नेमक्या समस्यांचा शोध लाकडे नेणे. त्यावर योग्य उपाय शोधणे. कार्यक्रम बनवून तो राबविणे आणि गरीब शैक्षणिक वर्षाच्या निकालातून अशा उपक्रमांची फलश्रुती आणि उपयुक्तता राजकीयकरणे, अन्यथा फलदायी नसेल, तर तो उपक्रम काढून टाकणे असे नेगवेगळे शैक्षणिक उपक्रम व प्रयोग येथे सुरू झाले. पडताळून घेणे, उपयुक्त असेल तर पुढच्या वर्षी त्या उपक्रमांची अंमलबजावणी याचे फलित म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आय.आय. टी., इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पीलानी, रिजनल इंजिनिअरिंग महाविद्यालय, यु.डी. सी.टी., मुंबई व महाराष्ट्रातील इंजिनीअरिंग तसेचऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स विविध नामांकित शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश मिळविला. या सर्व उपक्रमांना लोकांनी पुढे 'शाहू पॅटर्न' व नंतर 'लातूर पॅटर्न' हे नाव दिले. हा पॅटर्न साचेबंद नसून अत्यंत लवचिक आहे. काळानुसार आणि गरजेनुसार अपेक्षित बदल हे या पॅटर्नचे वैशिष्ट्य आहे.

शाहू पॅटर्न म्हणजे समर्पण, त्याग, सुसंगतीने आणि अतिशय प्रयत्नशील अशा शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या अतिशय कष्टाळू अशा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आणि संस्थाचालकांच्या प्रोत्साहनपर कल्पना-आदर्शाचा आग्रह, नैतिक मूल्यांची जोपासना करण्यावर भर, नैतिक आदर्शवाद आणि अतिशय गुणवत्तापूर्ण शिक्षण, हस्तक्षेप न करता देणं, या सर्वांची ऊर्जा घेऊन चालणारे इंजिन होय असे आप्पाचे ठाम मत होते

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्याच्या 'झींिींळीं ष एलशश्रश्रशपलश' ला पूर्णपणे अंगीकारिलेले आहे व भावी पिढ्यांपर्यंत लोग ही गुणवत्तेची पहाट घेऊन जाण्यासाठी, त्यांच्यासाठी आम्ही कटिबद्ध असू असा हा उच्च ध्येयवाद ऊराशी बाळगणारे डॉ .गोपाळराव पाटील यांचेबद्दल असेच म्हणावे लागेल

। दिव्यत्वाची जेथ प्रचिती। तेथे कर माझे जुळती ।

**भिमाशंकर ( सुभाष) जगदेवस्वामी देवणीकर**
**सचिव पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट – आलूर –लातूर**

## ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी SWAYAM प्लॅटफॉर्मवर मोफत कोर्सेस सुरु; असा करा अर्ज!

देशातील इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे अधिक रुंदावत, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग' (NCERT) ने एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या 'स्वयम' (SWAYAM) प्लॅटफॉर्मवर ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी तब्बल ११ विषयांचे ऑनलाइन कोर्सेस पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचावे आणि डिजिटल शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. शालेय अभ्यासासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे कोर्सेस अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

**२१ आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण**

NCERT ने तयार केलेले हे कोर्सेस एकूण २१ आठवड्यांच्या कालावधीचे आहेत. यामध्ये अकाउंटन्सी, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, भौतिकशास्त्र, गणित, मानसशास्त्र, समाजशास्त्र, बिझनेस स्टडीज आणि इंग्रजी या महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थी त्यांच्या वेळेनुसार हे कोर्सेस पूर्ण करू शकतात.

**काय असतील फायदे?**

या कोर्सेसमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान नसून, ऑडिओ-व्हिडिओ लेक्चर्स, शंका निरसनासाठी डिस्कशन फोरम्स आणि तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच, स्वतःच्या अभ्यासाचे मूल्यमापन करण्यासाठी वेळोवेळी क्विझ आणि चाचण्या घेतल्या जातील. कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिकृत प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.

**अर्ज कसा करावा?**

विद्यार्थी खालील सोप्या स्टेप्स फॉलो करून नोंदणी करू शकतात

१. सर्वप्रथम SWAYAM पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी करा.

२. आपल्या आवडीचा किंवा इयत्तेनुसार विषय निवडून 'Enrol' बटणावर क्लिक करा.

३. नोंदणी पूर्ण झाल्यावर अभ्यासासाठी साहित्य (Study Material) उपलब्ध होईल.

४. सर्व उपक्रम आणि अभ्यास पूर्ण करा.

५. प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अंतिम परीक्षेला बसणे अनिवार्य आहे.

## अक्कलदाढेचा ठणका असह्य होतोय? जाणून घ्या दाढ का दुखते आणि त्यावरील प्रभावी उपचार

बहुतांश व्यक्तींमध्ये जबड्याचा आकार पूर्ण विकसित झालेला असतो. यामुळे या नवीन दाढेला उगवण्यासाठी पुरेशी जागा उरत नाही. परिणामी, ही दाढ येताना आजूबाजूच्या हिरड्यांवर आणि दातांवर प्रचंड दबाव निर्माण होऊन तीव्र वेदना सुरू होतात. अक्कलदाढ पूर्णपणे बाहेर न येता हिरडीतच अडकून राहणे, हे दुखण्याचे सर्वात मुख्य कारण ठरते.

अनेकदा दाढ तिरपी किंवा आडवी आल्यामुळे ती शेजारच्या दुसऱ्या दाढेला ढकलते. यामुळे दातांच्या रांगेत बदल होतो आणि जबड्यात ठणक जाणवू लागते. जेव्हा ही दाढ अर्धवट बाहेर येते, तेव्हा त्याभोवती हिरडीचा एक छोटा पापुद्रा तयार होतो. या भागात अन्नाचे कण साचून राहतात आणि तिथे जीवाणूंची वाढ होते. या स्थितीला 'पेरिकोरोनायटिस' असे म्हणतात. यामुळे हिरड्यांना सूज येणे, पू होणे आणि तोंडाला दुर्गंधी येणे असे त्रास उद्भवतात. काही प्रकरणांमध्ये संसर्ग इतका वाढतो की, रुग्णाला ताप येतो, कान आणि डोके दुखू लागते, तसेच तोंड उघडताना किंवा घास घेतानाही प्रचंड त्रास होतो.

या वेदनांचे निदान करण्यासाठी प्रामुख्याने एक्स-रेचा वापर केला जातो. याद्वारे दाढेचा कोन आणि तिची मुळे नेमकी कुठे आहेत, हे स्पष्ट होते. प्राथमिक अवस्थेत संसर्ग कमी करण्यासाठी वेदनाशामक औषधे दिली जातात. संसर्ग कमी करण्यासाठी अँटिसेप्टिक माऊथवॉशचा वापरही उपयुक्त ठरतो. दाढ वारंवार त्रास देत असेल किंवा तिची स्थिती शेजारच्या दातांना धोकादायक असेल, तर शस्त्रक्रियेद्वारे ती काढून टाकणे हाच कायमस्वरूपी आणि सुरक्षित उपाय मानला जातो. आजच्या प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत सुलभ आणि वेदनारहित पद्धतीने करता येते.

घरगुती स्तरावर तात्पुरता आराम मिळवण्यासाठी कोमट मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करणे अत्यंत प्रभावी ठरते. मिठाच्या पाण्यामुळे तोंडातील नैसर्गिक स्वच्छता होते आणि सूज कमी होण्यास मदत होते. याव्यतिरिक्त गालाच्या बाहेरील बाजूने बर्फाने शेकल्यास रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि वेदनांची तीव्रता कमी होते. हे उपाय केवळ तात्पुरते असतात. हिरड्यांमधून रक्त येत असेल, चेहरा सुजला असेल किंवा गिळताना त्रास होत असेल, तर विलंब न करता तज्ज्ञ दंतवैद्याचा सल्ला घेणे अनिवार्य आहे.

**– डॉ. निखिल देशमुख, दंतवैद्यक**

## काय सांगता? कानातला मळ काढू नये?

शरीराची स्वच्छता राखणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच कानांची काळजी घेणेही गरजेचे असते. मात्र, अनेकदा आपण कान साफ करण्याच्या नादात स्वतःचेच नुकसान करून घेतो. म्हणूनच, घरी कान साफ करण्याचा प्रयत्न करू नका, असा सल्ला तज्ज्ञ देतात. कानात साचलेला मळ हा प्रत्यक्षात एक सुरक्षा कवच असून तो पूर्णपणे काढून टाकणे हानिकारक ठरू शकते, असेही सांगितले जाते.

**कानातील मळ तसाच राहू देणे योग्य की अयोग्य**

कानातील मळाला वैद्यकीय भाषेत सेरुमेन म्हणतात आणि त्यात जिवाणूविरोधी आणि बुरशीविरोधी गुणधर्म असतात. तो कानाच्या नलिकेतील ग्रंथींद्वारे तयार होतो. जेव्हा चिकट मळ कानाच्या नलिकेत जमा होतो, तेव्हा जिवाणू, धूळ आणि इतर सूक्ष्म कण त्या मळात अडकतात, ज्यामुळे ते कानाच्या पडद्यापर्यंत आणि आतील पडद्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. यामुळे संसर्ग आणि दुखापतीचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. कानातील मळ कानाच्या नलिकेतील ओलावा टिकवून ठेवण्यासही मदत करतो, ज्यामुळे कोरडेपणा आणि जळजळ टाळता येते.

कानात थोड्या प्रमाणात मळ साचणे हे पूर्णपणे सामान्य आणि फायदेशीर आहे. या अवयवामध्ये एक नैसर्गिक यंत्रणा असते जी तो आपोआप साफ करते. त्यामुळे, तो जबरदस्तीने पूर्णपणे स्वच्छ करण्याची आवश्यकता नसते. तथापि, काही परिस्थितींमध्ये स्वच्छता अत्यंत महत्त्वाची ठरते. खरं तर, जेव्हा कानातील मळ जास्त प्रमाणात साचतो तेव्हा ती एक समस्या बनते. यामुळे कान बंद होऊ शकतो, ज्यामुळे ऐकू कमी येणे, अस्वस्थता, खाज सुटणे आणि कानात आवाज येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

# टोमॅटो खाण्याचे फायदे

जर तुम्हाला सलग ३० दिवस टोमॅटोचा रस प्या असे सांगितले तर तुम्ही प्याल का? असा प्रश्न आहे. पण तुम्हाला जर महिनाभर टोमॅटोचा रस प्यायल्याने होणारे कमालीचे बदल सांगितले तर मात्र तुम्ही आजपासूनच टोमॅटोचा रस प्यायला सुरूवात कराल. कारण आपल्या स्वयंपाकघरात रोज दिसणारा टोमॅटो, केवळ भाजीतला रंग बदलत नाही तर आरोग्याचा रंगही बदलू शकतो.

टोमॅटो हा एक नैसर्गिक औषधाचा खजिना आहे. त्यामुळे टॉमेटोचा रस रोज प्यालात तर तुम्हाला रोजच्या जीवनात अनेक महत्त्वाचे फायदे होऊ शकतात. टोमॅटोमुळे होणारा पहिला आणि महत्त्वाचा फायदा म्हणजे टोमॅटोमध्ये असलेले घटक 'बॅड कोलेस्ट्रॉल' कमी करून 'गुड कोलेस्ट्रॉल' वाढवतात. त्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारून हार्ट अटॅकचे प्रमाण कमी होते. दुसरं म्हणजे दररोज टोमॅटोचा रस प्यायल्याने किडनी आणि मूत्रसंस्था स्वच्छ राहते. यामुळे युरिनच्या समस्यांना पुर्णविराम मिळतो. तसेच शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडतात.

चेहऱ्याची त्वचा नितळ ठेवण्यासाठी फॉलो करा या टिप्स!

आपल्या शरीरात जेव्हा एखादा बदल होतो, तेव्हा त्याचा परिणाम लगेच आपल्या चेहऱ्यावर दिसतो. जसे की, आपण अतिउष्ण पदार्थ खाल्ले तर चेहऱ्यावर पुरळ ...

तिसरं म्हणजे टोमॅटोमध्ये मुबलक 'व्हिटॅमिन के' असतं. त्यामुळे हाडे मजबूत होतात. टॉमेटोच्या रसामुळे वजन नियंत्रणात राहतं. त्यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असेल तर महिनाभर टॉमेटोचा रस प्या. जे लोक फिटनेसकडे लक्ष देतात, त्यांच्यासाठी तर टोमॅटोचा रस नैसर्गिक डिटॉक्स ड्रिंक आहे. शरीराप्रमाणेच त्वचेलाही टोमॅटोचा फायदा होतो. टोमॅटोतील लाइकोपीन हे अँटिऑक्सिडंट त्वचेवरील डाग कमी करतात आणि सूर्यकिरणांपासून त्वचेचं संरक्षण करतात. त्यामुळे टोमॅटोमुळे चेहऱ्यावरचा ग्लो वाढतो!

आता तुम्हाला टोमॅटोचा रस कसा करावा असा प्रश्न पडला असेल?

टोमॅटोचा रस करण्यासाठी टोमॅटो स्वच्छ धुवा, कापा आणि मिक्सरमध्ये वाटा. त्यात थोडं मीठ, काळी मिरी, आलं आणि लिंबाचा रस मिसळा. अशाप्रकारे तुम्ही रोज टोमॅटोचा रस प्यायलात तर नक्कीच शरीराला महत्त्वाचे फायदे होतील.



# आनंदी जीवनासाठी सोप्या टिप्स

**वर्तमान काळात जगा:** भूतकाळातील दुःखांचा विचार करणे सोडून द्या आणि भविष्याची चिंता करू नका. आजचा दिवस आनंदात जगा.

**तुलना करणे टाळा** आपली तुलना इतरांशी करू नका. तुमची जीवनशैली वेगळी आहे आणि ती स्वीकारा.


नकारात्मकता दूर ठेवा मनातून द्वेष, लोभ आणि मत्सर यांसारखे विचार काढून टाका.**छंद जोपासा** (त्रेश्रश्रु केललळशी): तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी करा, जसे की गाणी ऐकणे, वाचन करणे किंवा फिरणे. यामुळे मानसिक शांतता मिळते.

**कुटुंबासोबत वेळ घालवा:** प्रियजनांसोबत आणि मित्रांसोबत वेळ घालवल्याने आनंद वाढतो.

**व्यायाम आणि योग:** शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी दररोज व्यायाम किंवा योगासने करा. यामुळे तणाव कमी होतो.

**समाधानी राहा** जे आपल्याकडे आहे, त्यात आनंद मानणे शिका. समाधानी जीवन हेच आनंदी जीवन आहे.

हसत राहा आयुष्य छोटे आहे, त्यामुळे लहान लहान गोष्टींमध्ये आनंद शोधा आणि नेहमी हसत राहा.



# एआयकडे खर्च आहे का ऊर्जासंकटावर तोडगा...?

अर्थनगरीतून : महेश देशपांडे


सध्याच्या ऊर्जा संकटावर तोडगा म्हणून सरकारने ३७ हजार कोटींची मदत योजना जाहीर केली आहे. हवाई वाहतूक उद्योगाप्रमाणेच 'एआय' कंपन्यांनाही स्पर्धेमुळे मोठ्या प्रमाणावर पैसा ओतावा लागत असून त्यातून सध्या तरी शून्य परतावा मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

इंधनाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच सुमारे ३७ हजार पाचशे कोटी रुपयांच्या नव्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी देण्याची शक्यता आहे. या योजनेचा मुख्य उद्देश देशात 'कोल गॅसिफिकेशन' प्रकल्पांना चालना देणे हा आहे. यामध्ये कोळशाचे रूपांतर 'सिंगॅस' या वायूमध्ये केले जाते. या वायूचा वापर इंधन, वीज निर्मिती, खतनिर्मिती आणि रासायनिक पदार्थ तयार करण्यासाठी केला जातो. पारंपरिक पद्धतीने कोळसा जाळण्यापेक्षा ही पद्धत अधिक स्वच्छ आणि कार्यक्षम मानली जाते.

भारताकडे सुमारे ४०१ अब्ज टन कोळश्याचा साठा असल्यामुळे या तंत्रज्ञानाद्वारे कोळश्याचा अधिक प्रभावी वापर करता येईल. या प्रस्तावित योजनेचा एकूण निधी ३७ हजार ५०० कोटी रुपये आहे. एका प्रकल्पासाठी कमाल तीन हजार कोटी रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. यात वेगवेगळ्या श्रेणी न ठेवता सर्व प्रकल्पांना समान चौकटीत प्रोत्साहन दिले जाईल.

यापूर्वी सरकार गॅसीफिकेशन प्रकल्पांसाठी वेगवेगळ्या श्रेणींनुसार प्रोत्साहन देत होते. खासगी क्षेत्रासाठी सुमारे एक हजार कोटी रुपये आणि सरकारी कंपन्यांसाठी सुमारे १,३५० कोटी रुपयांपर्यंत मर्यादा होती; मात्र नव्या योजनेत एका प्रकल्पासाठी तीन हजार कोटी रुपयांपर्यंत मदत दिली जाणार असल्याने गुंतवणूक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सरकारने २०३० पर्यंत १०० दशलक्ष टन ('कोळसा गॅसीफिकेशन' क्षमता विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सध्या भारताच्या ऊर्जा गरजांमध्ये कोळश्याचा वाटा ५५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. भारत हा जगा–तील दुसर्या क्रमांकाचा कोळसा उत्पादक आणि वापरकर्ता देश आहे. आगामी काळात ऊर्जा मागणी वाढण्याची शक्यता असल्याने ही तंत्रज्ञानात्मक दिशा महत्त्वाची ठरते. या योजनेचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे एलएनजी, युरिया, अमोनिया आणि मिथेनॉल यांसारख्या उत्पादनांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे.

**'ए आय' तोट्यात**कृत्रिम बुद्धीमत्ता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) क्षेत्रात आघाडी कायम ठेवण्यासाठी जगातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या प्रचंड गुंतवणूक करत आहेत; मात्र या वाढत्या खर्चामुळे त्यांच्या नफ्यावर दबाव येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुंतवणूक संस्था 'जेफ्रीज' च्या अहवालानुसार, ही स्पर्धा आता उच्चांक गाठत असून त्याचे परिणाम कंपन्यांसाठी चिंताजनक ठरू शकतात. क्रिस्टोफर वूड हे 'जेफ्रीज'मध्ये 'ग्लोबल इक्विटी स्ट्रॅटेजी' प्रमुख आहेत. त्यांच्या मते 'गूगल', 'मायक्रोसॉफ्ट' आणि 'मेटा' यासारख्या कंपन्यांचा 'ए आय




वरील खर्च त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत वेगाने वाढत आहे.. अहवालानुसार, अमेरिकेतील चार मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांनी २०२३ मध्ये त्यांच्या कमाईपैकी सुमारे ४१ टक्के रक्कम एआय इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च केली. २०२६ संपेपर्यंत हा आकडा वाढून ९२ टक्क्यांपर्यंत जाईल, असा अंदाज आहे. यापैकी जवळपास ३० टक्के खर्च केवळ चिप्स आणि मेमरी खरेदीसाठी होत आहे. यामुळे कंपन्यांचा बहुतांश महसूल हार्डवेअर आणि यंत्रसामग्रीवर खर्च होत असल्याचे दिसते.

क्रिस्टोफर वुड यांच्या मते, 'एआय' क्षेत्र हळूहळू इंटरनेटसारख्या उच्च नफ्याच्या व्यवसायापेक्षा एअरलाइन उद्योगासारखे होत आहे. तिथे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते; पण नफा तुलनेने कमी असतो. 'मायक्रोसॉफ्ट' यंदा सुमारे १९० अब्ज डॉलर खर्च करण्याच्या तयारीत आहे, तर 'ॲमेझॉन' ने दोनशे अब्ज डॉलरचा खर्च निश्चित केला आहे. 'गूगल' आणि 'मेटा' देखील मोठ्या गुंतवणुकीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये परतावा कधी मिळेल याबाबत चिंता वाढली आहे.

'एआय' बाजारात 'चॅटजीपीटी'संदर्भातही मिश्र संकेत दिसत आहेत. अहवाल–ानुसार कंपनीला वापरकर्त्यांच्या संख्येत अपेक्षित वाढ आणि महसूल उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही. मार्चपर्यंतच्या आकडेवारीनुसार, 'जनरेटिव्ह एआय' बाजारात 'चॅटजीपीटी' चा हिस्सा ७७.४ टक्क्यांवरून ५६.७ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. दुसरीकडे 'गूगल जेमिनी' ने मोठी वाढ नोंदवत आपला हिस्सा सहा टक्क्यांवरून २५.५ टक्क्यांपर्यंत नेला आहे. तसेच 'अँथ्रोपिक' सारख्या कंपन्याही महसुलाच्या बाबतीत 'ओपन एआय' ला कडवी स्पर्धा देत आहेत.


गुंतवणूकदारांना विशेषतः 'मेटा' संदर्भात अधिक चिंता वाटत आहे, कारण 'गूगल' आणि ' मायक्रोसॉफ्ट'च्या तुलनेत त्यांच्याकडे क्लाउड सेवांमधून थेट महसूल मिळवण्याचे साधन कमी आहे. याशिवाय 'एआय' क्षेत्रातील निधी उभारणीच्या पद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. उद–ाहरणार्थ, 'एनव्हिडीया' आणि 'ओरॅकल' या कंपन्या 'ओपनएआय' ला निधी पुरव–तात आणि 'ओपन एआय' त्याच निधीचा वापर करून पुन्हा त्याच कंपन्यांकडून संगणकीय सेवा खरेदी करते. त्यामुळे या आर्थिक मॉडेलच्या टिकाऊपणावरही चर्चा सुरू झाली आहे.

पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही भार–ताची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे चित्र समोर आले आहे. नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलन विक्रमी पातळीवर पोहोचले असून वाहन विक्रीतही लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. एप्रिल महिन्यात जीएसटी संकलन २.४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. ते गेल्या एप्रिलमध्ये २.३७ लाख कोटी रुपये होते.एप्रिलमध्ये देशांतर्गत बाजारात सुमारे ४ लाख ४५ हजार ४१७ कार, सेडान आणि युटिलिटी वाहनांची विक्री झाली. मागील वर्षातील तीन लाख ५६ हजार ११३ युनिट्सच्या तुलनेत ती २५ टक्क्यांनी अधिक आहे.

मारुती सुझुकीने या काळात आतापर्यंतची सर्वोत्तम मासिक कामगिरी नोंदवत एक लाख ८७ हजार ७०४ वाहनांची विक्री केली. ती वार्षिक आधारावर ३५ टक्के वाढ दर्शवते. 'टाटा मोटर्स'ने ३०.५ टक्के वाढीसह सुमारे ५९,००० वाहने विकली, तर 'महिंद्रा अँड महिंद्रा'ने ने ७.६ टक्के वाढीसह ५६ हजार ३३१ वाहनांची विक्री केली. 'ह्युंदाई मोटर्स इंडिया'ने आपली स्थिर कामगिरी कायम ठेवली. एप्रिलमध्ये 'यूपीआय' द्वारे होणारे डिजिटल व्यवहार २५ टक्क्यांनी वाढून २९ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले, तर एकूण व्यवहार मूल्यामध्ये २१ टक्क्यांची वाढ झाली. याचबरोबर वीज वापरातही ४.०४ टक्क्यांची वाढ होऊन तो १५३.९९ अब्ज युनिट्सपर्यंत पोहोचला.

तज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम अद्याप भारतातील अंतर्गत मागणीवर मोठ्या प्रमाणात दिसून आलेला नाही. 'ईवाय इंडिया' च्या सौरभ अग्रवाल यांच्या मते, मजबूत जीएसटी संकलन हे भारताच्या खप–आधारित अर्थव्यवस्थेची ताकद दर्शवते. 'मारुती सुझुकी'च्या पार्थो बनर्जी यांच्या मते, कर सवलती, व्याजदरातील घट आणि प्राप्तिकरमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ यांसारख्या निर्णयांमुळे मागणी मजबूत राहिली आहे. तथापि, तज्ज्ञांच्या मते आगामी महिन्यांमध्ये जीएसटी संकलन किंचित घटूही शकते. कारण बाजार नवीन परिस्थितींशी जुळवून घेत आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




शरीरसंबंधावेळी शरीरातून बाहेर पडणाऱ्या इंड्रोफिन्स हार्मोनमुळे पाळीदरम्यान होणाऱ्या वेदनांपासून सुटका होते. पाळीदरम्यान सहवास अशास्त्रीय नाही(मवय वाढलं तरी महिलांनी सुंदर दिसण्याचा आग्रह का?दादा कोंडकेंचे विनोद निष्पाप होते की अश्लील?एके दिवशी धर्मच नामशेष झाला तर...?रचेल यांच्या मते पाळीदरम्यान सहवास केल्यानं रक्तस्रावाचा धोका कमी होऊ शकतो. ज्या महिला पाळीदरम्यान नियमितपणे सहवास करतात त्यांच्या पाळीचा कालावधीही कमी होतो.

## २ Joke — विनोद




तुला आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला काय हवं? सिंगापूरची दोन तिकिटं की एक छानसा टेपरेकॉर्डर? अनिलने आपल्या पत्नीला विचारले.ङ्गसिंगापूरची दोन तिकिटंच आणा का ग?
कारण तिथं गेल्यावर टेपरेकॉर्डर घेता येईल. सिंगापूरला टेपरेकॉर्डर खूप स्वस्त मिळतात.

## ३ Message — संदेश



Har subah teri duniya me roshni kar de
Rab tere gum ko teri khushi kar de, Jab bhi tootne lage teri sansein….
Khuda tujme shamil meri zindagi kar de.

## ४ Thought — सुविचार

उद्योग हेच माणसाचे लक्षण आहे.




**संस्कृत सुभाषित**

**दुर्जन: प्रियवादीच नैतद् विश्वासकारणम् ।**
**मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषम् ।।**

**अर्थ :** दुष्ट माणूस गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्याच्यावर जिभेवर मध असला तरी हृदयात मात्र भयंकर विष असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### आडवे उत्तरे

१.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

### उभे उत्तरे

१.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी




## थोडक्यात/ संक्षिप्त

### उर्विल पटेलच्या वेगवान अर्धशतकामुळे चेन्नईचा विजय

**चेन्नई :** एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर रविवारी आयपीएलमधील असा एक सामना पाहायला मिळाला, जो क्रिकेट इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला. लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सच्या उर्विल पटेलने तांडव घातला आणि अवघ्या १३ चेंडूत अर्धशतक झळकावत आयपीएल इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतकाच्या विक्रमाची बरोबरी केली. त्याच्या या वेगवान अर्धशतकामुळे चेन्नईचा ५ बळी राखुन विजय झाला. लखनऊने दिलेल्या २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात आक्रमक झाली. संजू सॅमसनने १४ चेंडूत २८ धावा केल्या, पण तो बाद झाल्यानंतर तिसर्या क्रमांकावर आलेल्या उर्विल पटेलने खेळाचे चित्रच पालटून टाकले. उर्विल डगआऊटमधूनच सेट होऊन आल्यासारखा खेळत होता. त्याने मैदानात पाऊल ठेवताच फटकेबाजी सुरू केली. उर्विलच्या या खेळीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याने सलग ७ चेंडूंवर ६ षटकार आणि १ चौकार ठोकून स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या प्रेक्षकांना वेडे करून सोडले. लखनऊच्या गोलंदाजांकडे त्याच्या या आक्रमणाचे कोणतेही उत्तर नव्हते.अर्धशतक पूर्ण केल्यानंतर उर्विलने अत्यंत भावनिक पद्धतीने सेलिब्रेशन केले. त्याने आपली बॅट आकाशाकडे उंचावली आणि खिशातून एक चिठ्ठी काढली आहे, ज्यामध्ये लिहिले की, मपप्पा, हे फक्त तुमच्यासाठी...फत्याने हे यश आपल्या वडिलांना समर्पित केले. उर्विलच्या या यशामागे त्याच्या वडिलांचे मोठे कष्ट आहेत, आणि एका जागतिक मंचावर अशा प्रकारे चमकणे हा त्यांच्यासाठी खरोखरच अभिमानास्पद क्षण ठरला. त्याच्याआधी संजू सॅमसन याने २८ धावा केल्या. त्याचा त्रिफळा दिविशसिंग राठी याने उडविला. उर्विल पटेल याने ६५ धावा तर गायकवाड याने ४२ धावा केल्या. कार्तिक शर्मा २० आणि डेल्वाल्ड ब्रेविस १० धावा करून बाद झाले. शिवन दुबे याने १५ धावा तर प्रशांत वीर याने १८ धावा करून नाबाद राहिले.

### केविन मॅकेन्झी यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी दुःखद निधन

**केपटाऊन :** दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट इतिहासातील एक महान फलंदाज आणि मकसोटी क्रिकेट न खेळू शकलेले सर्वोत्तम खेळाडूफम्हणून ओळखले जाणारे केविन मॅकेन्झी यांचे वयाच्या ७७व्या वर्षी निधन झाले. गोल्फ कोर्सवर त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि क्रीडा विश्वाने एक महान खेळाडू गमावला. केविन हे दक्षिण आफ्रिकेचे माजी स्टार फलंदाज नील मॅकेन्झी यांचे वडील होते. केविन मॅकेन्झी यांनी त्यांच्या २० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ट्रान्सवाल संघासाठी १३३ प्रथम श्रेणी सामने खेळले. त्यांनी ३६.५१ च्या सरासरीने ६,७५६ धावा केल्या, ज्यात १३ शतकांचा समावेश होता. ३६ ची सरासरी आजच्या काळात सामान्य वाटू शकते, मात्र ७० आणि ८० च्या दशकात दक्षिण आफ्रिकेतील खेळपट्ट्या पूर्णपणे गोलंदाजांना पोषक असायच्या. अशा परिस्थितीत त्यांनी केलेली ही कामगिरी त्यांच्या कौशल्याची साक्ष देते. मॅकेन्झी यांचा दुर्दैव म्हणजे, त्यांची कारकीर्द अशा काळात होती जेव्हा दक्षिण आफ्रिकेवर वर्णभेद धोरणामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बंदी घालण्यात आली होती. १९७० मध्ये दक्षिण आफ्रिकेवर ही बंदी लादण्यात आली, ज्यामुळे मॅकेन्झी यांच्यासारख्या अनेक प्रतिभावान खेळाडूंना अधिकृत कसोटी सामने खेळण्याची संधी मिळाली नाही.आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिकृत ओळख नसतानाही, मॅकेन्झी यांनी दक्षिण आफ्रिकेसाठी ७ अनधिकृत कसोटी सामने खेळले होते. केविन यांचे स्वप्न त्यांचे चिरंजीव नील मॅकेन्झी यांनी पूर्ण केले. नील यांनी २००० ते २००९ या काळात दक्षिण आफ्रिकेसाठी ५८ कसोटी, ६४ एकदिवसीय आणि २ टी-२० सामने खेळले. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जवळपास ५,००० धावा केल्या. नील मॅकेन्झी यांची गणना दक्षिण आफ्रिकेच्या यशस्वी सलामीवीरांमध्ये केली जाते. केविन यांच्या निधनानंतर क्रिकेट विश्वा-तून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांचे माजी सहकारी आणि दिग्गज वेगवान गोलंदाज विन्स व्हॅन डर बिजल यांनी अत्यंत भावूक शब्दांत त्यांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, केविन यांच्या अचानक जाण्याच्या बातमीने आम्ही सर्व

## तर मी स्वतःला आरशातही पाहू शकणार नाही...

# प्रसूतीनंतरच्या संघर्षावर विनेश फोगट पहिल्यांदाच बोलली!



**कुस्तीपटू विनेश फोगाट यांनी आपल्या निवृत्तीच्या निर्णयावर आणि भविष्यातील संघर्षावर प्रथमच भाष्य केले आहे. ङ्गजर मी हार मानली, तर मी स्वतःला आरशात पाहू शकणार नाही,ङ्ग अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. भारतीय कुस्ती महासंघाने (थऋख) विनेश फोगटला उत्तर प्रदेशा-तील गोंडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यापासून रोखले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे महासंघाने तिच्यावर २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांसाठी बंदी घातली आहे.**

**नवी दिल्ली:**.प्रसुतीनंतर पुनरागमन करण्यासाठी विनेश फोगटच्या मार्गात कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसंच, कुस्ती महासंघाने तिला कारणे दाखवा नोटिसही बजावली आहे. याबाबत तिने कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांची भेट घेऊन नोटिशीला तात्पुरते उत्तरही दिले आहे. दरम्यान, त्यांना थऋख हुकूमशाही वाटत असून मॅटवर परतण्याची त्यांना भीती वाटत असल्याचं त्यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितलं. त्यांचा १० महिन्यांचा मुलगा त्यांना कशी व्यवस्थेशी दोन हात करण्याची प्रेरणा देतो इथप-ासून विविध मुद्द्यांवर विनेश फोगट यांनी इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं.

नेमकं प्रकरण काय?

पॅरिस ऑलिम्पिकनंतर विनेशने निवृत्ती घेतली होती. मात्र, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि ऑलिम्पिक स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून तिने पुनरागमनाचा निर्णय घेतला. संयुक्त आंतरराष्ट्रीय महासंघ आणि 'डब्ल्यूएफआय' यांच्या नियमानुसार वेळेत निवृत्ती मागे घेण्याची प्रक्रिया विनेशकडून पार पाडण्यात आली. त्यानंतर अनेक प्रयासानंतर मानांकन स्पर्धेसाठी विनेशचे नाव नोंदवले गेले. उत्तेजक सेवन प्रतिबंध संस्थेची प्रक्रिया देखील तिने पार पाडली. तिचा मानांकन स्पर्धेत खेळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, निकषच बदलल्यामुळे विनेश आता आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाहीत.

:तर मी स्वतःला आरशात पाहू शकणार नाही

२०२३ मध्ये तुम्ही जंतरमंतरवर आंदोलन केले होते, पण आता ही एक नवीन लढाई आहे. पुन्हा एकदा दीर्घकाळ लढा देण्यासाठी तयार तू तयार आहेस का? असा प्रश्न तिला विचारण्यात आला होता. त्यावर विनेश फोगट म्हणाली, कधीकधी मला वाटते की आता पुरे झाले आणि कदाचित मी माझा लढा थांबवावा. पण माझ्या लहानपणाप-ासून आतापर्यंत मला कधीही हार मानणे आवडलेले नाही. एकतर मी सुरुवात करत नाही किंवा एकदा सुरुवात केली की ती शेवटपर्यंत नेते. जर मी हार मानली, तर मी स्वतःला आरशात पाहू शकणार नाही.

ङ्गमी उगीच आढेवेढे न घेता थेट सांगतोःङ्ग, श्रेयस अय्यरने कोणाच्या डोक्यावर फोडलं पराभवाचं खापर; संतापलेला कर्णधार नेमकं काय म्हणाला? ठउइ ीी चख, खझङ २०२६: भावा हे वागणं बरं नव्हं! मुंबईचं आव्हान संपलं अनब टिम डेव्हिडच्या 'त्या' संतापजनक कृतीने आशियाई क्रीडा स्पर्धेस विनेश फोगट मुकणार; भारतीय कुस्ती म हासंघाकडून निवड चाचणी निकषात बदल झाशीची राणी रणांगणावर वीरमरण पत्करल्यामुळेच आजही स्मरणात.ङ्गलोकांनी मला रस्त्यावर लढताना आणि ऑलिम्पिकमध्ये खेळताना पाहिले आहे, त्यामुळे यंत्रणा मला उद्ध्वस्त करू शकते असे लोकांनी विचार करावा असे मला वाटत नाही. मला अशी व्यक्ती बनायचे आहे जी शेवटच्या श्वासापर्यंत लढते, मग ती यंत्रणा माझ्या विरोधात का असेना. माझ्या नशिबाचा निर्णय दुसऱ्या कोणाही घेऊ नये असे मला वाटते. क्रिधवने (विनेश फोगट यांचा मुलगा) देखील हे जाणून घ्यावे की, तो कितीही शक्तिशाली शक्तीशी लढत असला तरी, त्याने शेवटपर्यंत लढायला तयार असले पाहिजे. जे बोलत नाहीत त्यांना कोणीही लक्षात ठेवत नाही. झाशीची राणी रणांगणावर वीरमरण पत्करल्यामुळेच आजही स्मरणात आहेङ्ग, असंही ती म्हणाली.

दरम्यान, सोमवारी विनेश फोगटने सोमवारी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांची भेट घेतली. याबाबत ती म्हणाली, ङ्गमी डब्लूएफआय अध्यक्षांना सांगितले की, मला शुक्रवारी रात्री 'कारणे दाखवा' (हे-लर्रीश) नोटीस मिळाली आणि मला उत्तर देण्यासाठी १४ दिवसांचा वेळ देण्यात आला होता. मला मुलाची काळजी घ्यायची आहे, वजनाचे निकष पूर्ण करायचे आहेत आणि मी स्पर्धेची तयारी करत आहे. त्यामुळे वेळेअभावी मी डब्लूएफआयला थोडक्यात उत्तर दिले. मी त्यांना सांगितले की मी १४ दिवसांत सविस्तर उत्तर सादर करेन, त्यामुळे मला आता स्पर्धेत सहभागी होऊ द्या. १४ दिवसांनंतर, जर ते माझ्या सविस्तर उत्तराने समाधानी नसतील, तर तुम्ही कारवाई करू शकता. मी निवृत्ती घ्यावी अशी त्यांची इच्छा

ती पुढे म्हणाल्या कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांनी आधी कारणे दाखवा नोटिशीला सविस्तर उत्तर देण्यास सांगितलं. महासंघ १४-१५ दिवसांनंतर एक समिती स्थापन करणार असून समिती निर्णय घेणार असल्याचंही सिंह यांनी स्पष्ट केलंय. मी त्यांना म्हटलंय की 'आशा आहे की २०२८ च्या ऑलिम्पिकपूर्वी ही समिती आपली बैठक घेईल. थोडक्यात सांगायचे तर, डब्लूएफआयला मला आशियाई खेळांमध्ये सहभागी होण्यापासून रोखायचे आहे. डब्लूएफआयची इच्छा आहे की मी निवृत्ती घ्यावी.ङ्ग

# दिल्ली कॅपिटल्सने ३ गडी राखून थरारक विजय

### अक्षर पटेलने या दोघांना दिलं विजयाचं श्रेय; सामन्यानंतर सांगितला टर्निंग पॉईट, म्हणाला



मोहाली: पंजाब किंग्सने दिलेल्या २११ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने ३ गडी राखून थर-ारक विजय मिळवला. विजयानंतर कर्णधार अक्षर पटेलने सामन्याचा टर्निंग पॉईट सांगताना गोलंदाजांचे आणि युवा खेळाडूंचे विशेष कौतुक केले. अक्षर (५६) आणि डेव्हिड मिलर (५१) यांच्या अर्धशतकी खेळीमुळे दिल्लीने प्लेऑफच्या शर्यतीत स्वतःला कायम राखले आहे.

: आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५५ वा सामना पंजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. म ोहालीच्या मैदानावर पार पडलेल्या या साम न्यात पंजाबने पहिल्या डावात फलंदाजी करताना २१० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सकडून आधी अक्षर पटेलने दमदार अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर शेवटी डेव्हिड मिलरने दमदार अर्धशतक झळकावलं, माधव तिवारीने नाबाद १८ धावांची खेळी करून दिल्लीला विजय मिळवून दिला. दिल्लीने हा सामना ३ गडी राखून आपल्या नावावर केला. दरम्यान या विजयानंतर बोलताना अक्षर पटेल काय म्हणाला? जाणून घ्या.

या सामन्यातील टर्निंग पॉईट कोणता? असा प्रश्न विचारला असता अक्षर पटेल म्हणाला, ङ्गमला वाटतं सुरुवातीच्या ३-४ षटकात गोलंदाजी करताना आम्ही ६० धावा खर्च केल्या होत्या. पण त्यानंतर मधल्या षटकांमध्ये मुकेश कुमार आणि माधव तिवारी यांनी ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, त्यांनी मला राजस्थान रॉयल्सविरूद्धच्या सामन्याची आठवण करुन दिली. हाच या सामन्यातील खास क्षण ठरला. त्यानंतर फलंदाजी करत असताना माझ्या आणि डेव्हिड मिलरच्या खेळीमुळे डाव स्थिरावला.

त्यानंतर शेवटी फलंदाजी करताना आशुत-ोष शर्मा आणि माधव यांसारख्या युवा खेळाडूंनी अतिशय सुंदर शेवट केला.तसेच तो पुढे म्हणाला की, ङ्गमी मागच्या काही सामन्यांपासून एकच गोष्ट सांगतोय. ती म्हणजे, महत्वाच्या क्षणी आम्ही चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरत होतो. जेव्हा जेव्हा सामना निर्णायक टप्प्यावर येत होता, तेव्हा निकाल आमच्या विरोधात जात होता. तरीही मी हेच सांगत होतो, की हा उत्तम संघ आहे, आम्ही चांगलं क्रिकेट खेळत आहोत. प्रत्येक दिवस वेगळा असतो. त्यामुळे आम्ही आज ज्या पद्धतीने खेळ केला, ते पाहता मला तर खूप आनंद झाला आहे. सुनील गावसकरांची मोठी भविष्यवाणी! म्हणाले 'हे' २ संघ खेळणार खझङ २०२६ स्पर्धेची फायनल.मोहालीच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या पंजाब किंग्सने २० षटकांअखेर २१० धावा केल्या. पंजाबकडून कर्णधार श्रेयस अय्यरने नाबाद ५९ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सकडून आधी अक्षर पटेलने ५६ धावांची खेळी केली. त्यानंतर डेव्हिड मिलरने ५१ धावा केल्या. शेवटी आशुतोष शर्माने २४, माधव तिवारीने १८ आणि आकिब नबीने १० धावा करून दिल्लीला ३ गडी राखून विजय मिळवून दिला.


### बीसीसीआय सूर्यकुमारला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरुन हटवणार?

मुंबई : टी-२० विश्वचषक जिंकूनही भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव अडचणीत सापडल्याची चर्चा रंगू लागली आहे. आयपीएल सुरू असतानाच आता त्याच्या नेतृत्वावर आणि फलंदाजीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. रिपोर्टनुसार, बीसीसीआयच्या थिंक-टॅंकला सूर्याकुमारच्या सातत्याने कमी होत चाललेल्या धावांमुळे नाराजी आहे. कर्णधार म्हणून त्याचा विजयाचा टक्का प्रभावी असला, तरी वैयक्तिक कामगिरीत मात्र मोठी घसरण दिसून येत आहे. विश्वचषकामध्ये त्याच्या एकूण धावांपैकी मोठा वाटा अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात आला, पण महत्त्वाच्या मोठ्या सामन्यांमध्ये तो अपेक्षेप्रमाणे चमकू शकला नाही. याचदरम्यान आता भारतीय संघात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २०२८ ऑलिम्पिक आणि पुढील टी-२० वर्ल्ड कप लक्षात घेऊन निवड समिती नव्या नेतृत्वाच्या शोधात असल्याचे बोलले जात आहे. या शर्यतीत श्रेयस अय्यर याचे नाव सर्वात आघाडीवर असल्याचे समोर येत आहे.

### मेघना सज्ञनारमुळे भारताला नेमबाजीत सांघिक सुवर्णपदक

**नवी दिल्ली :** आठ महिन्यांची गर्भवती असलेल्या भारतीय नेमबाज मेघना सज्जनारने आशियाई नेमबाजी चॅम्पियनशिप २०२६ मध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक कांस्यपदक मिळवून आणि भार-ताला सांघिक सुवर्णपदक जिंकून देण्यात मदत करून एक उल्लेखनीय दुहेरी कामगिरी केली. तिच्या कामगिरीने विलक्षण चिकाटी आणि कौशल्य दाखवून दिले; तिने आपल्या सहकार्यांसोबत जोडी जमवून सांघिक प्रकारात वर्चस्व गाजवले आणि वैयक्तिक पदकावरही आपले नाव कोरले.उपलब्धीचा प्रमुख तपशील:वैयक्तिक कामगिरी: मेघना सज्जनारने ८ महिन्यांची गर्भवती असताना स्पर्धेत भाग घेऊन वैयक्तिक कांस्य पदक पटकावले.सांघिक सुवर्णपदक: तिने संघातील सदस्यांसोबत मिळून भारतासाठी महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक सुवर्णपदक मिळवले.संदर्भ: हा पराक्रम नवी दिल्ली येथे झालेल्या आशियाई नेमबाजी चॅम्पियनशिप २०२६ मध्ये घडला, जिथे तिने प्रचंड एकाग्रता आणि शारीरिक कणखरपणा दाखवला.महत्व: तिच्या कामगिरीने भारतीय क्रीडा क्षेत्रातील प्रस्थापित समजुती मोडून काढल्या.

# जडेजाचे सेलिब्रेशन पाहून चाहते चक्रावले




जयपूर : आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सवाई मानसिंह स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात एक अशी घटना घडली, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. राजस्थानचा अनुभवी फिरकीपटू रवींद्र जडेजाने गुजरातचा धडाकेबाज फलंदाज जॉस बटलरला बाद करताच मैदानात केलेल्या सेलिब्रेशनने सोशल मीडियावर खळबळ उडवली. सामन्याच्या १४व्या षटकात बटलर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात बाद झाला. जडेजाने टाकलेल्या फुल लेंथ चेंडूवर बटलरने लॉन्ग-ऑफच्या दिशेने हवेत फटका खेळला, मात्र चेंडू नीट टाइम झाला नाही. त्यानंतर डोनोव्हन फेरेराने सहज झेल घेत बटलरचा डाव संपवला. पण खरी चर्चा विकेटनंतर सुरू झाली. बटलर पॅव्हेलियनकडे परतत असताना जडेजाने हात खिशाकडे नेत असा इशारा केला, जणू त्याने बटलरला खिशात टाकलं आहे. हे सेलिब्रेशन काही चाहत्यांना प्रचंड आक्रमक आणि अपमानास्पद वाटलं.

विशेष म्हणजे, टी-२० क्रिकेटमध्ये जडेजा नेहमीच बटलरवर भारी पडला आहे. आतापर्यंत या दोघांमध्ये १२ वेळा सामना झाला असून जडेजाने बटलरला तब्बल ३ वेळा बाद केलं आहे. बटलरने जडेजाच्या ६६ चेंडूंवर फक्त ८२ धावा केल्या असून त्याचा स्ट्राइक रेटही केवळ १२४.२४ इतकाच राहिला आहे. कदाचित हाच दबदबा दाखवण्यासाठी जडेजाने हे हटके सेलिब्रेशन केलं असावं. मात्र आता या एका इशार्यामुळे सोशल मीडियावर चाहत्यांमध्ये जोरदार वाद रंगला आहे.जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळल्या जाणार्या आयपीएल २०२६ च्या ५२ व्या सामन्यात गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २३० धावांचे विशाल लक्ष्य ठेवले आहे. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा राजस्थानचा निर्णय गुजरातच्या फलंदाजांनी पूर्णपणे चुकीचा ठरवला. सलामीवीर आणि कर्णधार शुभमन गिलने अवघ्या ४४ चेंडूंत ८४ धावांची (९ चौकार, ३ षटकार) स्फोटक खेळी केली.



# आता आयपीएल २०२६ मध्ये वाढली ची चुरस

धरमशाला : आयपीएल २०२६ मध्ये आतापर्यंत ५४ साखळी सामने (लीग मॅच) झाले आहेत. धरमशाला येथे आज दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स यांच्यात साखळी सामना होत आहे. हा यंदाच्या हंगामातील ५५ वा साखळी सामना आहे. धरमशालातील सामना वगळता साखळी फेरीचे आणखी १५ सामने व्हायचे आहेत. अद्याप कोणताही संघ बाद फेरीत अर्थात प्लेऑफ राउंडमध्ये पोहोचलेला नाही.

झइघड तड ऊ: आज आयपीएलमध्ये दिल्ली विरुद्ध पंजाब आमने सामने , पंजाब पुनरागमनासाठी सज्ज ....

धर्माशाळा : आयपीएल २०२६ मध्ये आज ५४ वा सामना पंजाब किंग्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स मध्ये होणार आहे. हा सामना पंजाबच्या धर्माशाला स्टेडियमवर होणार आहे. ...

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स या तीन संघांचे प्रत्येकी ११ साखळी सामन्यांनंतर (लीग मॅच) प्रत्येकी १४ गुण आहेत. पंजाब किंग्सचे १० साखळी सामन्यांनंतर (लीग मॅच) १३ तर चेन्नई सुपरकिंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांचे प्रत्येकी ११ साखळी सामन्यांनंतर (लीग मॅच) प्रत्येकी १२ गुण आहेत. यामुळे अव्वल सहा पैकी बाद फेरी अर्थात प्लेऑफ राउंडसाठी कोणते चार संघ पात्र ठरणार यावरून चर्चेला उधाण आले आहे. आयपीएलमध्ये प्लेऑफ राउंडसाठी चुरस आहे.

ठउइ तड चख : आरसीबीला मोठ धक्का ! हेड कोचवर बीसीसीआयची करवाई, सामन्यादरम्यान अंपायरला...

इउउख -उढखजछ: आयपीएल २०२६ (खपवळरप झीशाळशी ङशरसींश २०२६) मध्ये वादांची मालिका सुरूच असून आता आरसीबी (ठूश्र उहरश्रश्रशपसर्शीी इशप-सरश्रीीीी) चे हेड कोच अँडी फ्लॉवर (-पवू ऋश्रेुशी) यांच्यावर बीसीसीआयने कारवाई केली आहे. ...कोलकाता नाईट रायडर्सचे १० साखळी सामन्यांनंतर (लीग मॅच) ९ झाले आहेत तर दिल्ली कॅपिटल्सचे ११ साखळी सामन्यांनंतर (लीग मॅच) ८ गुण झाले आहेत. पुढील सामने जिंकून अव्वल संघांचे गणित बिघडवण्याची क्षमता या संघांमध्ये आहे. यामुळे सध्या तर्कवितर्क जोरात सुरू आहेत.

खझङ २०२६ : पुन्हा नियमभंगाचा वाद! लखनऊच्या डगआउटमध्ये मोबाईल वापरल्याचा आरोप; बीसीसीआय कारवाई करणार का ?चेन्नई: आयपीएल २०२६ मध्ये रविवारी झालेल्या उहशपपरळ डींशिी घळपसी आणि डींलझपु डींशिी ऋळरपींी यांच्यातील सामन्यानंतर नव्या वादाला सुरुवात झाली आहे. यापूर्वी ठरक्षरींहरप ठूश्री संघावर ...लीग राउंड अर्थात साखळी सामन्यांची फेरी संपल्यानंतर गुणतालिकेत पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेले संघ क्वालिफायर १ खेळतील. विजेता संघ आयपीएल फायनल खेळेल तर क्वालिफायर १ चा पराभूत संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये खेळेल. गुणतालिकेत तसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असलेले संघ एलिमिनेटर खेळतील. या सामन्यातील विजेत्याला दुसऱ्या क्वालिफायरमध्ये खेळण्याची संधी मिळेल तर पराभूत संघाचे आव्हान संपेल. क्वालिफायर १ आणि क्वालिफायर २ या दोन्ही सामन्यांचे विजेते आयपीएल फायनल खेळतील.

भारताचे माजी क्रिकेटपटू लिटिल मास्टर सुनील गावस्कर यांनी आयपीएल फायनल ही पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात होईल; असे भाकीत केले आहे. हे भाकीत खरे होते का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष आहे.

# सोमनाथ मंदिर देशाच्या आत्म्याचे प्रतीक - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## सोमनाथ स्वाभिमान पर्व – अतूट आस्थेचे १००० वर्षी या विशेष भक्तिपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी:** सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा ‘सोमनाथ स्वाभिमान पर्व – अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते. यावेळी इलेक्ट्रानिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तथा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त अशोक भन्साळे यांनीही महादेवाचे दर्शन घेतले. यानंतर मान्यवरांनी ‘सोमनाथ स्वाभिमान पर्व’ प्रदर्शनालाही भेट दिली.



सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेच्या ७५ वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना संबोधित करताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्वावर प्रकाश टाकला. महमूद गझनीपासून औरंगजेबापर्यंत अनेक परकीय आक्रमकांनी मंदिर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिराचे अस्तित्व आणि त्यामागील श्रद्धा कधीही नष्ट होऊ शकली नाही, असे त्यांनी सांगितले. भारत हा केवळ भौगोलिक देश नसून तर तो एक चिरंतन संस्कृती आहे. विविध मंदिरे, साधू-संत आणि सनातन परंपरेमुळे भारताचा आत्मा आजही जिवंत आहे. ‘सनातन’ म्हणजे ज्याचा अंत नाही आणि सोमनाथ मंदिर हे त्याचे जिवंत उदाहरण आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना शुभदा वराडकर यांच्या नृत्याविष्काराने झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचा समृद्ध आविष्कार त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. सादर झालेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# साठये कॉलेज आणि पीआरएसआय मुंबईमध्ये सामंजस्य करार

## विद्यार्थ्यांना मिळणार उद्योगविश्वासाठीचा प्रत्यक्ष अनुभव

**मुंबई/प्रतिनिधी :** पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन अंतर्गत असणाऱ्या साठये कॉलेजच्या मास मिडिया विभाग आणि पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) मुंबई चॅप्टर यांच्यात उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृध्दिंगत करण्यासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. विद्यार्थ्यांना व्यावसायिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव व संवाद कौशल्यांची संधी उपलब्ध करून देणे, हा या कराराचा मुख्य उद्देश आहे.

पीआरएसआयच्या विद्यार्थी मंच ‘नालंदा’च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना जनसंपर्क आणि संवाद क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, इंटर्नशिप, कार्यशाळा, तज्ज्ञ संवाद तसेच पीआरएसआयच्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

या सामंजस्य करारावर पीआरएसआय मुंबई चॅप्टरचे सचिव डॉ. मिलिंद आवताडे आणि साठये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी साठये कॉलेजच्या मास मीडिया विभागाचे प्रमुख डॉ. गजेंद्र देवडा, पीआरएसआय मुंबईच्या सहसचिव प्रा. दैवता पाटील, खजिनदार अमलन मस्कारन्हास तसेच कार्यकारिणी सदस्य जेनेट अरोले उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. मिलिंद आवताडे यांनी सांगितले की, या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वातील प्रत्यक्ष अनुभव, व्यावसायिक नेटवर्क आणि आधुनिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून ते स्पर्धात्मक रोजगार बाजारासाठी अधिक सक्षम होतील.

प्राचार्य डॉ. माधव राजवाडे म्हणाले की, हा करार वर्गातील शिक्षण आणि व्यावसायिक अनुभव यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणारा असून विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी उपयुक्त ठरेल.



पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन अंतर्गत कार्यरत साठये कॉलेजचा मास मीडिया विभाग मुंबईतील नामांकित मीडिया शिक्षण केंद्र म्हणून ओळखला जातो. शैक्षणिक परंपरा आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण यांचा संगम साधत या विभागाने अनेक कुशल मीडिया व्यावसायिक घडविले आहेत.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया ही देशातील जनसंपर्क आणि धोरणात्मक संवाद क्षेत्रातील अग्रगण्य व्यावसायिक संस्था असून नैतिक मूल्ये, व्यावसायिक गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य करते.

# पुरी - कामाख्या - बैद्यनाथ धाम यात्रेसाठी भारत गौरव पर्यटक ट्रेन; २५ जूनपासून पुण्याहून प्रस्थान

**सोलापूर /प्रतिनिधी :** भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या (IRCTC) वतीने भारत गौरव पर्यटक ट्रेनद्वारे पुरी – कामाख्या – बैद्यनाथ धाम यात्रा आयोजित करण्यात आली असून, २५ जून २०२६ रोजी पुणे येथून या विशेष आध्यात्मिक यात्रेला प्रारंभ होणार आहे. ११ रात्री व १२ दिवसांच्या या यात्रेमध्ये देशातील प्रमुख धार्मिक स्थळांचे दर्शन भाविकांना घडविण्यात येणार आहे.

या यात्रेत पुरी येथील जगन्नाथ मंदिर, गुवाहाटी येथील कामाख्या मंदिर, जसीडीह येथील बैद्यनाथ धाम, वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिर तसेच अयोध्या येथील राम जन्मभूमी मंदिराचा समावेश आहे. संपूर्ण पॅकेजची सुरुवात प्रतिव्यक्ती २२,७७० पासून होत असून, यात्रेदरम्यान प्रवाशांना आरामदायी व सुरक्षित सुविधा



उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

IRCTC पश्चिम विभागाचे ग्रुप जनरल मॅनेजर गौरव झा यांनी सांगितले की, ही विशेष एसी व नॉन-एसी पर्यटक ट्रेन प्रवाशांना भारताच्या समृद्ध आध्यात्मिक व सांस्कृतिक वारशाचा अनुभव देईल. तसेच पुणे, लोणावळा, कर्जत, पनवेल, कल्याण, नाशिक, मनमाड, चाळीसगाव जंक्शन, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा आणि नागपूर या स्थानकांवरून प्रवाशांना चढण्याची व उतरण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

सुमारे ७५० प्रवाशांची क्षमता असलेल्या या ट्रेनमध्ये इकोनॉमी स्लीपर (SL), स्टँडर्ड 3-C आणि कम्फर्ट 2-C अशा विविध श्रेणींची सुविधा उपलब्ध आहे. यात्रेदरम्यान बजेट हॉटेलमध्ये निवास व्यवस्था, शुद्ध शाकाहारी भोजन, एसी/नॉन-एसी वाहनांद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन, प्रवास विमा तसेच IRCTC चे अनुभवी टूर मॅनेजर उपलब्ध राहणार आहेत.

IRCTC पश्चिम विभागाचे प्रवक्ते डॉ. ए. के. सिंह यांनी सांगितले की, प्रवाशांच्या आरोग्य व सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा आणि व्यवस्थांची काळजी घेण्यात आली आहे.

पॅकेज शुल्कानुसार इकोनॉमी क्लास (स्लीपर) साठी २२,७७०, स्टँडर्ड क्लास (3-C) साठी ३९,६२० आणि कम्फर्ट क्लास (2-C) साठी ५२,८६० इतके शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

या यात्रेसाठी नोंदणी खठउढउ च्या पर्यटन पोर्टलवर सुरू झाली असून, अधिक माहितीसाठी 8287931886 या क्रमांकावर किंवा bgtmumbaiirctc.com या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आध्यात्मिक ऊर्जा, प्राचीन परंपरा आणि आरामदायी प्रवासाचा सुंदर संगम अनुभवण्यासाठी ही यात्रा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार असून, मर्यादित जागा उपलब्ध असल्याने त्वरित नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला आयएसओ नामांकन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट कामांबद्दल आयएसओ (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडर्डायझेशन) नामांकन मिळाले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली आणि अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली जनसंपर्क विभागाने हे यश मिळविले आहे. जनसंपर्क विभागामध्ये महाराष्ट्रात आयएसओ नामांकन मिळविणारा महापारेषणचा जनसंपर्क विभाग पहिलाच ठरला आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करत अनेक अभिनव उपक्रम राबविले आहेत. ‘महापारेषण समाचार’ या गृहमासिकेमध्ये



क्यू-आर कोड, पॉडकास्ट आणि डिजिटल संवाद तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती सादरीकरणाला आधुनिक रूप दिले. जाहिराती आणि जनजागृती मोहिमांमध्ये डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करणारा हा विभाग राज्यातील अग्रगण्य विभाग म्हणून ओळखला जातो.

विशेष म्हणजे, जनसंपर्क क्षेत्रात तब्बल १५ पुरस्कार पटकाविण्याचा विक्रमही महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने आपल्या नावावर केला आहे. आयएसओ नामांकनामुळे महापारेषणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दरम्यान, महापारेषणच्या जनसंपर्क विभागाचे आयएसओ नामांकनचे प्रमाणपत्र लेखानिबंधक श्री. विजयकुमार स्वामी यांनी अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्याकडे सुपूर्द केले. याप्रसंगी महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क विभागाचे श्री. श्रीकांत जाधव उपस्थित होते.

### जनसंपर्क विभाग अग्रेसर : डॉ. संजीव कुमार

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर सकारात्मकपणे ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण अभिनव कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

# लातूर जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू; २० मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींच्या सहा शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी गरजू विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये लातूर एमआयडीसी, लामजना (ता. औसा), तोंडारपाटी (ता. उदगीर) आणि मरशिवणी (ता. अहमदपूर) येथे मुलांच्या शाळा, तर जाऊ (ता. निलंगा) आणि बावची (ता. रेणापूर) येथे मुलींच्या निवासी शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये इयत्ता सहावीच्या वर्गासाठी मुख्यत्वे प्रवेश दिले जाणार असून, सातवी ते दहावीच्या वर्गांमधील रिक्त जागांवरही प्रवर्गानुसार प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. प्रवेशासाठी शासनाचे आरक्षणाचे नियम लागू असून, त्यात अनुसूचित जातीसाठी ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विमुक्त भटक्या जमाती ३ टक्के, विशेष मागास प्रवर्ग २ टक्के आणि दिव्यांग प्रवर्गासाठी ५ टक्के जागा राखीव आहेत.

प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता ४० विद्यार्थी इतकी असून, इच्छुकांनी २० मे २०२६ पर्यंत संबंधित शाळेत अर्ज सादर करणे आवश्यक आहे, त्यानंतर १ जून २०२६ रोजी पहिली निवड यादी प्रसिद्ध केली जाईल. प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाकडून शैक्षणिक साहित्य, निवास, भोजन, गणवेश आणि ट्रॅक सूट यांसारख्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने, अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक किंवा समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा.

## स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांच्या स्नेहमिलन कार्यक्रमात काँग्रेस-वंचित आघाडीच्या नगरसेवकांशी संवाद



**लातूर/प्रतिनिधी :** निवडणुकीपुरते राजकारण आणि त्यानंतर केवळ समाजकारण ही लोकनेते विलासराव देशमुख साहेबांची शिकवण आहे. महापालिकेची निवडणूक आणि पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया आता पूर्ण झाली असून, नूतन पदाधिकाऱ्यांनी व नगरसेवकांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र यावे, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज येथे केले.

लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नूतन सभापती सचिन बंडापल्ले यांनी शनीवार (दि. ९ मे) सायंकाळी आयोजित केलेल्या स्नेहमिलन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी लोकप्रिय खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, माजी महापौर ॲड. दीपक सूळ, ॲड. किरण जाधव, गट नेते विजय कुमार साबदे, ॲड. समद पटेल उपस्थित होते.

यावेळी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, हा आपला आणि तो परका असा भेदभाव न करता विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनाही सोबत घेऊन जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा. कल्पक योजनांच्या माध्यमातून शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी नूतन पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे. स्नेहमिलन कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार देशमुख यांनी शहरातील विविध प्रभागांतील समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी भविष्यात राबवायच्या योजनांबाबत उपस्थित नगरसेवकांशी विचारविनिमय केला. अत्यंत सुसंवादपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्याबद्दल त्यांनी सचिन बंडापल्ले यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवानिमित्त फळे वाटप



**रेणापूर /प्रतिनिधी :** वंचीत बहुजन आघाडीचे वतीने वंचीत बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्रध्देय ड .प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या ७२ व्या वाढदिवसा निमीत्ताने ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला यावेळी तालुका कार्यकारणीतील वंचीत बहुजन आघाडीचे रेणापूर या तालुका अध्यक्ष रतन आचार्य ता . संघटक कृष्णा वाघमारे तामहा सचीव विशाल मस्के जेष्ठ नेते कमलाकर चिकटे श विशाल कांबळे यांनी आभार मानले यावेळी तालुका व शहरातून नागरीक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांनी सर्वसमावेशक जिल्हा कार्यकारणी जाहीर केली



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर दि. ११ - भारतीय जनता पार्टीचे जिल्ह्यातील मान्यवर नेत्यांच्या मार्गदर्शनानुसार भारतीय जनता युवा मोर्चा लातूर ग्रामीण जिल्हा सर्व समावेशक कार्यकारणी नुकतीच भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी जाहीर केली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी पालकमंत्री आ. संभाजीराव निलंगेकर, आ. रमेशआप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व मान्यवर नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सल्ल्यानुसार भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर जिल्हा ग्रामीण भाजयुमोची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून त्यात सरचिटणीसपदी संजय ठाकूर पाटील लातूर, रामानंद मुंडे अहमदपूर, प्रकाश पाटील निलंगा, सचिन अनसरवाडे औसा, रामेश्वर कलबुर्गे उदगीर यांचा समावेश करण्यात आला आहे.

भाजयुमोच्या जिल्हा कार्यकारणीत सोशल मीडिया प्रमुख महेश गाडे, युवती प्रमुख कु. श्रद्धा अरुण हसुरे यांची नियुक्ती करण्यात आली असून कोषाध्यक्षपदी मुकुंद केसरे यांची तर उपाध्यक्ष तम्मा माडीबोणे, सदानंद पाटील, गणेश मोहिते, संगम पताळे, अमित कारभारी, शरद पांचाळ, रामेश्वर चावरे, विकास पाटील, रमेश पाटील, भागवत गुट्टे, वामन मुळे, ओम प्रकाश कराड यांची तर सचिव पदी महेश मसलगे, ज्योतीराम बिराजदार, अमर मडजे, साधुराम कांबळे, दत्ता बलुरे, अजय मुलमवाड, साईनाथ धनुरे, रवी माकूडे, अक्षय भोसले, शिवम बुके, विशाल माळी यांच्यासह कार्यकारणी सदस्यात समाधान जागजे, प्रशांत बिडवे, मेघराज जाधव, उद्धव जाधव, रोकडोबा भुसाळे, विनायक गुणारे, अभिजीत तिडोळे यांच्यासह अनेकांचा समावेश करण्यात आला आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या असून भाजयुमो जिल्हा कार्यकारिणीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

# नाईक विद्यालय व त्रिवेणीबाई पाटील विदयालयाचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

**नळेगाव/अजगर मजकुरी :** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील अनंत तुळजाराम नाईक विद्यालय व त्रिवेणीबाई पाटील विदयालय यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत दहावी शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.संस्थेच्या वतीने गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अनंत तुळजाराम नाईक विद्यालयाचा एकूण निकाल ९६ टक्के लागला असून एकूण ३९ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह, ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ९० टक्केच्या पुढे दहा विद्यार्थ्यांनी गुण मिळवले आहेत.

अजित सूर्यवंशी व शिवम बापुरे यांनी (९६.२० ) गुण मिळवून संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला.द्वितीय - वसुंधरा सावंत (९५.६० ),तृतीय- अथर्व बोळेगावे (९५.४० ) क्रमांक पटकावला. ८५ टक्केच्या पुढे गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये खालील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

हरिओम तेलंगे (९५.२०), वेदांत पवार (९३.००), सुशांत शिरूरे (९२.२०),आरुषी बिराजदार (९१.८०), पल्लवी तेलंगे (९१.००), निकिता माचवे (९०.६०), स्वराज सावंत (८९.८०), मानसी भालेकर (८८.६०),

ज्ञानेश्वरी गव्हाणे (८७.२०), शिवम हसनाळे (८७.००), ज्ञानेश्वरी फरकांडे (८६.२०), अस्मिता शेलार(८५.८०), रुद्राक्ष बिराजदार ( ८५.००)



त्रिवेणीबाई पाटील विद्यालयाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी यशाचा चढता आलेख कायम ठेवत दहावी शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.या परीक्षेला एकूण ६४ विद्यार्थी बसले होते व त्यात ६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयाचा एकूण ९६.८२ टक्के एवढा निकाल लागला.विशेष प्राविण्यासह - २५,प्रथम श्रेणी -१९,द्वितीय श्रेणी -१६ उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून प्रथम - दीपक डोरले (९२.००),द्वितीय - उदगिरे समर्थ उदगीरे (९१.६०), तृतीय-हर्षद कांबळे (९०.२० )

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांच्या सत्कारावेळी संस्थेचे सचिव डॉ. माणिकराव पाटील,अध्यक्ष- माधवराव पाटील ,उपाध्यक्ष - सूर्यकांत रेड्डी,सहसचिव जिवनराव बिराजदार , उमाकांत देवशटवार, अमर पाटील, अभिजीत पाटील कैलास रेड्डी, डॉ प्रशांत शिरुरे.वृंदा अमर पाटील, अजय पाटील, त्रिवेणीबाई पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सगर,अनंत तुळजाराम नाईक विद्यालयाचे मुख्याध्यापक जीवन रेड्डी,

व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेचा समारोप

**पुणे/प्रतिनिधी :** या राष्ट्रीय स्पर्धेतील सर्व सांघिक व वैयक्तिक विजेत्यांना करंडक व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रेय पडळकर (महापारेषण), कोकणचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (महावितरण), स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष व पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे (महावितरण), मुख्य अभियंते सर्वश्री अनिल कोलप, दत्तात्रेय बनसोडे, धर्मराज पेठकर, स्वप्निल काटकर, अंकुर कावळे, संजय पाटील, संजय कुऱ्हाडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार, खजीनदार श्री. ललित गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटणी, भक्ती जोशी, सोनाली बाविस्कर, स्वागती सोळंकुरे यांनी केले




तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे यांनी मानले. पुढील वर्षापासून कुस्ती स्पर्धेसाठी महिला गटाचा समावेश करण्याचा निर्णय यावेळी नियंत्रण मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आला.

कबड्डीच्या विजेतेपदाचे महावितरणकडून स्वप्न साकार - अत्यंत चुरशीच्या उपांत्य फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघावर मात करीत मागील वर्षीचा विजेता हिमाचल प्रदेश विरुद्ध महावितरण संघ यंदाही आमनेसामने आले. दोन्ही संघात राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असल्याने अंतिम सामन्यासाठी क्रीडा प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली. सामन्याच्या पहिल्या पाच ते सात मिनिटात हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईवर भर देत ६ विरुद्ध २ अशी आघाडी घेतली. सर्व गडी बाद झाल्यानंतर कोर्टात एकमेव असलेल्या महावितरणच्या नीलेश ठाकूर याने आक्रमक चढाईत हिमाचल प्रदेशच्या दोन खेळाडूंना बाद केले. तर लगेचच विरोधी चढाई करणाऱ्या हिमाचल प्रदेशचा मातब्बर रामगोपालला महावितरणच्या तीन बचावपटूंनी बाद केले आणि याच ठिकाणी सामना फिरला.

त्यानंतर हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईऐवजी सावध व बचावात्मक पवित्रा स्वीकारला. तोच पवित्रा स्वीकारून महावितरणकडून कर्णधार अमित जाधव, अभिषेक नर, अजय शिंदे, रजत गोमासे, रोहित जिवतोडे, नीतेश पोवार, प्रतिक मुरकुटे, दीपक माने यांनी बचावात्मक फळीला आणखी आक्रमक बनवले. हिमाचल प्रदेशच्या गुरूमीत, अभिनंदन, हेमराज, मनीष कुमार, गुरुविंदर या बलाढ्य चढाईपटूंना बाद करीत सामन्यावर पकड मिळविली. मध्यंतरापर्यंत महावितरण संघ १७ विरुद्ध १३ गुणांनी आघाडीवर होता. अत्यंत चुरशीच्या व रंगतदार सामन्यात अखेर महावितरणने ३४ विरुद्ध २४ गुणांनी बलाढ्य हिमाचल प्रदेशवर मात केली व या राष्ट्रीय स्पर्धेत १५ वर्षांनंतर कबड्डीमध्ये विजेतेपद मिळवले. यात संघाचे प्रशिक्षक नीलेश नाईक व व्यवस्थापक श्री. रामगोपाल अहिर यांचेही योगदान महत्वाचे ठरले. कबड्डीच्या महिला गटात देखील महावितरण विरुद्ध हिमाचल प्रदेश अशी लढत झाली. मात्र हिमाचल प्रदेशने सुरवातीला घेतलेली आघाडी कायम ठेवत महावितरणचा २१ विरुद्ध १२ गुणांनी पराभव केला. त्यामुळे महावितरणच्या महिला कबड्डी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## का असे...

कळली न दाहकता
युध्दाचा चटका बसे
भ्रमात मी आरामात
धुरावर विश्वास नसे

मुक्त खर्चे इंधन धन
क फल्लक हो खिसे
तुटवडा जरा दिसता
किती बनले वेडेपिसे

अपारंपरिक उर्जेकडे
दुर्लक्ष झाले का कसे
प्रबोधन गर्दभांसमोर
स्वताचेचं करतो हसे

धोरणेहवीचं कशाला
सर्वचालले आदमासे
परकीयचलनांचे प्रश्न
अर्थ व्यवस्थेला ग्रासे

जलव्यवस्थापन करे
थेंबा थेंबा जसे तरसे
प्रमाद असून आपले
परक्या टिकास्त्रबरसे

व्यंग आमचे समजले
दुजे दाखवता आरसे
घेरलो जाईतो संकटी
मनावर न घेई फारसे

जागृत जरी विलंबाने
खंबीरते उभे विश्वासे
बदलाव करतो वर्तन
एक जुटीला आश्वासे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


# आलमला ब्ल्यु बर्ड सायन्स कॉलेजचा ९८.१४ टक्के दैदिप्यमान निकाल

**आलमला /प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षा २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या ब्ल्यु बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजने ९८.१४ टक्के इतका उल्लेखनीय निकाल मिळविला आहे.

महाविद्यालयातील बिराजदार सिद्धी तुकाराम हिने ८४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाघलगावे अक्षता तुकाराम हिने ७९.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर धाराशिवे रुपाली धनंजय हिने ७२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यावर्षीच्या निकालात दोन विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून, १७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर ७६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळविली आहे. तसेच ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या यशामागे प्राचार्य योगेश माशाळकर, यास्मिन फाजल, हबीब सय्यद, अरबाज पठाण, विशाल चव्हाण व अनिकेत पांचाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष शिवचरणजी धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकरजी कापसे, सचिव बस्वराजजी धाराशिवे, सहसचिव महादेवजी खिचडे, व्यवस्थापक योगेशजी धाराशिवे, विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य प्रशांतजी धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्वेश्वरय्या औद्योगिक शिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यु बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर तसेच ब्ल्यु बर्ड स्कूलच्या प्राचार्या सौ. स्वाती कापसे यांनी केले.

# कमी खर्चात जास्त उत्पन्नाची हमी; लातूर जिल्ह्यात 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' अंमलबजावणी सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) शेतकऱ्यांना हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यास सक्षम करण्यासाठी लातूर जिल्ह्यात 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' (सीआरटी) प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 'नवीन तंत्रज्ञानाची किमया न्यारी, कमी खर्चात जास्त उत्पन्नाची हमी' हे ब्रीद घेऊन राबवल्या जाणाऱ्या या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

हवामानातील वाढती अनिश्चितता आणि 'एल निनो'चा संभाव्य धोका लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न शाश्वत करणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक यांनी पत्राद्वारे सर्व सरपंच महोदयांना या अभियानाचे नेतृत्व करण्याबाबत आवाहन केले आहे. ग्राम कृषी विकास समितीच्या माध्यमातून हे अभियान गावागावांत पोहोचवण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी रुंद व सरी वरंबे (बेड) तयार करणे, टोकन पद्धतीने लागवड, शून्य मशागत आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, तसेच पेरणीपूर्वी बियाणे उगवण क्षमता चाचणी व बीज प्रक्रिया करण्यावर भर द्यावा. कीड नियंत्रणासाठी निंबोळी व दशपर्णी अर्क, निमास्त्र, अग्न्यास्त्र यांसारख्या घरगुती अर्कांचा वापर करण्यासह जीवामृत व बीजामृत तयार करून जमिनीचे आरोग्य सुधारावे, असे तंत्रज्ञान सुचवण्यात आले आहे. चिकट सापळे आणि एकात्मिक शेती पद्धतीचा वापर करून खर्च कमी करत उत्पादन वाढवण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. या अभियानाच्या अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवांनी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, समूह सहाय्यक किंवा कृषी ताई यांच्याशी संपर्क साधून खरीप हंगामात प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

# यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात नवजात शिशू प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर राष्ट्रीय नवजात शिशु पुनरूत्थान प्रशिक्षण दिनानिमित्त लातूर येथील एम.आय.एम.एस.आर. मेडिकल कॉलेज बालरोग विभाग आणि लातूर जिल्हा बालरोग तज्ञ संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली कार्यशाळा यशस्वी झाली असून या प्रशिक्षण कार्यशाळेचा परिचारिका आणि नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला.

नवजात शिशूंच्या मृत्यूदरात घट करण्याच्या उद्देशाने नॅशनल निओनॅटोलॉजी फोरम इंडिया तर्फे संपूर्ण भारतभर नवजात शिशु पुनरूत्थान दिवस साजरा केला जातो. देशातील हा सर्वात मोठ्या समन्वित प्रशिक्षण उपक्रमांपैकी एक असून कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. जन्मानंतरची पहिली काही मिनिटे अत्यंत महत्त्वाची असतात आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांकडून वेळेवर मदत मिळाल्यास टाळता येण्याजोग्या मृत्यूंना प्रतिबंध करता येतो. राष्ट्रीय नवजात शिशु पुनरुत्थान प्रशिक्षण दिनानिमित्त, लातूर येथील एम.आय.एम.एस.आर. मेडिकल कॉलेजच्या बालरोग विभाग आणि लातूर जिल्हा बालरोग तज्ञ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बेसिक कार्यशाळेचे उद्घाटन वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नवाब जमादार आणि उपअधिष्ठाता डॉ. नागोबा सर यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेत डॉ. दिपिका माशाळकर (लीड इन्स्ट्रक्टर), डॉ. शीतल भट्टड आणि डॉ. विशाखा पडिले यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विभागप्रमुख डॉ. विद्या कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले तसेच बालरोग विभागातील निवासी डॉक्टर डॉ. श्रेया दाताळ, डॉ. शुभम डाके, डॉ. मनमीत सिंग, डॉ. शुभम काळेढेळे, डॉ. आकांक्षा आणि डॉ. स्वप्नील यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM SARWADE DATTRAYA GOVINDRAO TO SARVADE DATTRAYA GOVINDRAO HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SARVADE DATTATRAYA GOVINDRAO IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: SARWADE DATTATRAYA GOVINDRAO

NEW NAME: SARVADE DATTATRAYA GOVINDRAO

ADDRESS: C/O SARVADE GOVINDRAO,SHIVAJI NAGAR TQ NILANGA,DIST-LATUR (M.S.)413521

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM AKRAM SHRAFODDIN SHAIKH TO AKRAM SHARFODDIN SHAIKH
HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE AKRAM SHARFODDIN SHAIKH IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY

OLD NAME: AKRAM SHRAFODDIN SHAIKH

NEW NAME: AKRAM SHARFODDIN SHAIKH

ADDRESS: S/O SHRAFODDIN SHAIKH ANANDWADI, LATUR , MAHARASTRA, 413521

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६